मंगळवार, १९ जुलै २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक २
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

पनवेलमध्ये प्लास्टिक बंदीबाबत प्रदर्शन/३
रायगड जिल्हा परिषदेचे १३३ पूल धोकादायक/५
आशियाई शरीरसौष्ठव स्पर्धेत सुभाष पुजारींना 'सुवर्ण'/८

### पांडे, सिंग यांची सीबीआयकडून चौकशी



**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात सोमवारी (दि. १८) दिल्ली सीबीआयकडून राज्याचे माजी दोन पोलीस आयुक्त संजय पांडे आणि परमबीर सिंग यांची सहा तास चौकशी करण्यात आली. देशमुख यांच्यावर माजी पोलीस आयुक्त सिंग यांनी वसुलीचे आरोप लावले होते. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी वकील जयश्री पाटील यांनी केली होती. या प्रकरणात सीबीआयने गुन्हा दाखल केला होता. दरम्यान, ईडीनेदेखील पांडे यांची चौकशी केली आहे. ही चौकशी पांडे यांच्या कुटुंबाशी संबंधित आयसेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील एकूण १८ कोटी रुपयांच्या विविध व्यवहारांबाबत होती. याबाबत तपास सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# शिवसेना खासदारांमध्येही उभी फूट

## ■ १२ जणांची मुख्यमंत्री शिंदेंच्या बैठकीला उपस्थिती

**मुंबई : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेना पक्षाला गळती लागली आहे. शिवसेनेचे अनेक आमदार, आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्तेदेखील शिंदे गटात सहभागी झाले आहेत. यानंतर आता शिवसेनेच्या खासदारांमध्ये फूट पडली असून १२ खासदार सोमवारी (दि. १८) मुख्यमंत्री शिंदे यांनी बोलाविलेल्या बैठकीला उपस्थित होते. शिवसेना व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना हा मोठा धक्का मानला जात आहे.

मागील काही दिवसांपासून शिवसेनेचे खासदारदेखील फुटणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत शिवसेनेने भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) उमेदवार द्रौपदी मूर्मू यांना पाठिंबा द्यावा, अशी मागणी शिवसेनेच्या खासदारांकडून करण्यात आली होती. याबाबत खासदार राहुल शेवाळे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना पत्र दिले होते.

शिवसेना खासदारांच्या मनात सुरू असलेली खदखद लक्षात घेत उद्धव ठाकरेंनी राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवार द्रौपदी मूर्मू यांना पाठिंबा दिला. त्यानुसार सोमवारी राष्ट्रपतिपदासाठीची मतदान प्रक्रिया पार पडली, पण या मतदानानंतर उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसला. शिवसेनेच्या १२ खासदारांनी शिंदे गटाच्या बैठकीला हजेरी लावल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये राहुल शेवाळे (मुंबई दक्षिण मध्य), भावना गवळी (यवतमाळ-वाशिम), श्रीरंग बारणे (मावळ), हेमंत गोडसे (नाशिक), राजेंद्र गावित (पालघर), धैर्यशील माने (हातकणंगले), संजय मंडलिक (कोल्हापूर), सदाशिव लोखंडे (शिर्डी), श्रीकांत शिंदे (कल्याण), प्रताप जाधव (बुलडाणा), कृपाल तुमाने (रामटेक), हेमंत पाटील (हिंगोली) यांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे.

राष्ट्रपतिपदाच्या मतदानानंतर शिंदे गटाची बैठक मुंबईत हॉटेल ट्रायडंटमध्ये झाली. या बैठकीला शिवसेनेच्या १२ खासदारांनी ऑनलाइन पद्धतीने हजेरी लावली. या बैठकीत जवळपास अर्धा तास चर्चा झाली. या वेळी गटनेतेपदासाठी राहुल शेवाळे आणि मुख्य प्रतोदपदासाठी भावना गवळी यांच्या नावाची चर्चा झाल्याची माहितीदेखील समजते.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समर्थक आमदारांसह केलेल्या बंडानंतर शिवसेनेला गळती सुरूच आहे. अनेक नेते, पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधी मुख्यमंत्री शिंदेंना समर्थन देत आहेत. अशातच शिवसेनेला सोमवारी आणखी एक मोठा धक्का बसला. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा दिला.

### नवा गट स्थापन करण्याची तयारी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या खासदारांचा नवीन गट स्थापन करण्याच्या तयारीत असून त्याबाबत चर्चा करण्यासाठी ते दिल्लीला रवाना होणार असल्याचे कळते. याबाबतचे पत्र मंगळवारी लोकसभा अध्यक्षांना देण्यात येणार असल्याचीही सूत्रांची माहिती आहे.

## शिंदे गटाकडून शिवसेनेची नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईतील हॉटेल ट्रायडंटमध्ये समर्थक आमदारांची बैठक सोमवारी (दि. १८) झाली. या बैठकीत शिंदे गटाने शिवसेनेची नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर केली. यात मुख्यमंत्री शिंदे यांची शिवसेनेचे मुख्य नेते म्हणून एकमताने निवड करण्यात आली आहे.

नव्या कार्यकारिणीत दीपक केसरकर यांची प्रवक्तेपदी, तर नेतेपदी रामदास कदम आणि आनंदराव अडसूळ यांची निवड केल्याची घोषणा करण्यात आली आहे. कदम यांनी शिवसेना नेतेपदाचा राजीनामा दिल्यानंतर कदमांसह आनंदराव अडसूळ यांचीही पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर लगेचच शिंदे गटाने या दोघांना नेतेपद दिले आहे. याशिवाय उपनेतेपदी यशवंत जाधव, गुलाबराव पाटील, उदय सामंत, शरद पोंक्षे, तानाजी सावंत, विजय नाहटा, शिवाजीराव आढळराव पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# महाराष्ट्राच्या एसटी बसला मध्य प्रदेशात भीषण अपघात

## चालक-वाहकासह १२ जणांचा मृत्यू

**इंदूर : वृत्तसंस्था**



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसला मध्य प्रदेशात भीषण अपघात होऊन १२ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. इंदूरहून जळगावच्या अमळनेरकडे निघालेली ही बस सोमवारी (दि. १८) सकाळी धार जिल्ह्यातील खालघाट परिसरात पुलावरून नर्मदा नदीपात्रात कोसळली.

अमळनेर आगाराची ही बस होती. सकाळी साडेसातच्या सुमारास ही बस इंदूरहून निघाली होती आणि अमळनेरला येणार होती, मात्र खालघाटजवळ चालकाचे नियंत्रण सुटून ही बस नर्मदा पुलाचा कठडा तोडून नदीपात्रात कोसळली. अपघातग्रस्त बसमध्ये चालक, वाहकासह १२ प्रवासी होते. दुर्घटनेची माहिती मिळताच बचावकार्य सुरू करण्यात आले.

दरम्यान, या अपघातानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. ही घटना दुःखद असून अशा काळात आपल्या प्रियजनांना गमावणाऱ्या कुटुंबीयांसोबत मी आहे, असा शोकसंदेश पंतप्रधान मोदी यांनी ट्विट केला आहे. त्याचप्रमाणे त्यांनी आर्थिक मदतही जाहीर केली आहे.

### मृतांच्या कुटुंबीयांना अर्थसहाय्य जाहीर

**मुंबई :** मध्य प्रदेशात नर्मदा नदीमध्ये एसटी बस कोसळून झालेल्या अपघाताबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे तसेच मृत्यू पावलेल्या प्रवाशांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपये देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश एसटी महामंडळाला दिले आहेत. त्याचप्रमाणे जखमींवरील उपचाराचा खर्चही एसटी महामंडळ करणार आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतूनही अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख, तर जखमींना ५० हजारांची मदत जाहीर करण्यात आली आहे. याशिवाय मध्य प्रदेश सरकारकडून मृताच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपये मदतीची घोषणा तेथील मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली आहे.

### सर्व मृतदेहांची ओळख पटली

नर्मदा नदीपात्रातून १२ अपघातग्रस्तांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून सर्वांची ओळख पटली आहे. यात चालक चंद्रकांत एकनाथ पाटील (४५, अमळनेर), वाहक प्रकाश श्रावण चौधरी (अमळनेर), अविनाश संजय परदेशी (अमळनेर), राजू तुलसीराम (३५, राजस्थान), जगन्नाथ जोशी (६८, राजस्थान), चेतन जागीड (राजस्थान), निंबाजी आनंदा पाटील (अमळनेर), सैफउद्दीन अब्बास अली बोहरा (मध्य प्रदेश), कल्पना विकास पाटील (५७, धुळे), विकास सतीश बेहरे (३३, धुळे), आरवा मुर्तजा बोहरा (२७, अकोला), रुख्मणीबाई जोशी (राजस्थान) यांचा समावेश आहे.

## निवडक

### भारतात मंकीपॉक्सचा दुसरा रुग्ण आढळला

**तिरूवनंतपूरम :** भारतात मंकीपॉक्स संसर्गाने चिंता वाढवली आहे. केरळमधील कन्नूर जिल्ह्यात मंकीपॉक्सचा दुसरा रुग्ण आढळून आला आहे. तो अलीकडेच दुबईहून भारतात परतला होता. त्यानंतर त्याच्यात मंकीपॉक्सची लक्षणे आढळून आली. सध्या त्याच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत.

### २५ किलोपेक्षा जास्त वजनी पॅकेटवर जीएसटीचा भार नाही

**नवी दिल्ली :** केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने (सीबीआयसी) जीएसटी दराशी संबंधित अनेक शंकांचे निरसन केले आहे. यात सीबीआयसीने स्पष्ट केले की २५ किलो (किंवा २५ लिटर)पर्यंतच्या सर्व प्री-पॅकेज वस्तूंवर पाच टक्के जीएसटी लागू होईल, मात्र एकाच पॅकेटमध्ये २५ किलोपेक्षा जास्त प्री-पॅकेज केलेल्या वस्तूंना जीएसटीमधून सूट मिळेल.


# राष्ट्रपतीपद निवडणुकीसाठी भरघोस मतदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाचे सर्वोच्चपद अर्थात राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी सोमवारी (दि. १८) मतदान प्रक्रिया झाली. या निवडणुकीसाठी देशभरातील आमदार-खासदारांनी मतदान केल्याने भरघोस मतदान झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीची मतमोजणी २१ जुलै रोजी होणार आहे. त्यानंतर नवनिर्वाचित राष्ट्रपती २५ जुलैला शपथ घेतील.

या निवडणुकीसाठी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)कडून झारखंडच्या माजी राज्यपाल द्रौपदी मुर्मू विरुद्ध संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए)चे यशवंत सिन्हा अशी लढत आहे. एनडीएचे संख्याबळ आणि इतर पक्षांनी दिलेला पाठिंबा पाहता मुर्मू यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

देशाच्या १६व्या राष्ट्रपतिपदासाठी मुंबई येथील महाराष्ट्र विधानभवनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर सदस्यांनी मतदान केले.






### विरोधी पक्षांमध्ये फूट; मुर्मू यांना केले मतदान

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत एनडीएने ताकद दाखवली, तर दुसरीकडे विरोधी यूपीएला मात्र क्रॉस वोटिंगला सामोरे जावे लागले. हरियाणात काँग्रेस आमदार कुलदीप बिश्नोई, गुजरातमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार कांधल जडेजा, झारखंडमध्ये आमदार कमलेश सिंह यांनी द्रौपदी मुर्मू यांना मतदान केले. सपमध्येही फूट पडली. **(पान २ वर..)**

### उपराष्ट्रपतिपदासाठी जगदीप धनखड यांचा अर्ज दाखल



**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपतिपदाचे भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)चे उमेदवार जगदीप धनखड यांनी सोमवारी (दि. १८) आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर मंत्री, प्रमुख पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी विरोधी पक्षांच्या यूपीएने मार्गारेट अल्वा यांना उमेदवारी दिली आहे, मात्र राष्ट्रपतिपदाप्रमाणेच उपराष्ट्रपतीपद निवडणुकीसाठीही एनडीएच्या उमेदवाराचे पारडे जड दिसत आहे. या निवडणुकीसाठी ६ ऑगस्ट रोजी मतदान, तर ११ ऑगस्टला मतमोजणी होईल.

## संसद सभागृहाची प्रतिष्ठा वाढवा -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवार (दि. १८)पासून सुरू झाले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी आपण सर्वांनी त्याचा राष्ट्रहिताकरिता वापर करूयात, असे आवाहन केले आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, सध्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव असून आगामी २५ वर्षांत जेव्हा शतक साजरे होईल तेव्हा तो प्रवास कसा असावा, किती वेगाने करावा, कोणती नवी उंची गाठावी याचा संकल्प करावा. देशाला नवी ऊर्जा देण्यासाठी संसदेचे हे अधिवेशन महत्त्वाचे आहे. याच कालखंडात देशाला नवे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती मिळणार असून त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

आम्ही नेहमीच सभागृहाला संवादाचे एक सक्षम माध्यम, तीर्थक्षेत्र मानत आलो आहोत, जिथे खुल्या मनाने संवाद होण्याची आवश्यकता आहे. गरज पडली तर वाद, टीका झाली पाहिजे. गोष्टींचे विश्लेषण झाले पाहिजे, जेणेकरून धोरणे आणि निर्णयांमध्ये सकारात्मक योगदान करता येईल. सखोल आणि उत्तम चर्चा झाली पाहिजे यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. सर्वांच्या प्रयत्नाने सभागृह चालते, उत्तम निर्णय घेऊ शकते. त्यामुळे सभागृहाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी आपण सर्वांनी त्याचा राष्ट्रहिताकरिता वापर करूयात.

# पावसाच्या विश्रांतीमुळे भात लावणीला वेग

## शिवारात घुमताहेत लोकगीतांचे सूर



**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील दोन दिवसांपासून पावसाने उसंत घेतल्यामुळे रायगड जिल्ह्यात भात लावणीच्या कामाला वेग आला आहे. लावणीची कामे सुरू असताना अंबोण्यांचे सूर शेतांमध्ये ऐकू येत आहेत.

रायगड जिल्ह्यात १० ते १२ दिवस जोरदार पाऊस पडत होता. सततच्या पावसामुळे शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. त्यामुळे रोपांची पुरेशी वाढ होऊनही भात लावणीची कामे रखडली होती, परंतु मागील दोन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. शेतात साचलेले पाणीदेखील कमी झाले आहे. त्यामुळे आता शेतीच्या कामांना वेग आला असून त्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू आहे.

शेतामध्ये चिखलणी, रोपे खणणे आणि लागवडीची कामे सध्या सुरू आहेत. एकमेकांना मदत करीत शेतीची कामे उरकली जात आहेत. शेतीच्या कामांसाठी पारंपरिक नांगराबरोबरच पॉवर टिलरचाही वापर केला जात आहे. खरीप हंगामात रायगड जिल्ह्यात साधारण ९५ हजार हेक्टर क्षेत्रावर भात लागवड केली जाते. दक्षिण रायगडात लावणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत, तर उत्तर रायगडात ३० टक्के लावण्या पूर्ण झाल्या आहेत. लावणीच्या कामादरम्यान शिवारांमध्ये अंबोण्यांचे सूर ऐकू येऊ लागले आहेत.

## संजय राऊत हाजिर हो!

### ■ शिवडी कोर्टाचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या तक्रारीप्रकरणी जबाब नोंदविण्यासाठी ६ ऑगस्ट रोजी हजर राहा, असे आदेश शिवडी न्यायालयाने शिवसेना खासदार संजय राऊत यांना दिले आहेत.



न्यायालयाने यापूर्वी मेधा सोमय्या यांच्या तक्रारीची दखल घेत शिवसेना खासदार राऊत यांना समन्स बजावून हजर राहण्याचे आदेश दिले होते, मात्र राऊत न्यायालयात हजर झाले नाहीत. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्या नावे जामीनपात्र वॉरंट बजावले होते. त्यानंतर १८ जुलै रोजी राऊत न्यायालयात हजर झाले होते. आता न्यायालयाने राऊत यांना ६ ऑगस्ट रोजी जबाब नोंदविण्यासाठी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

## ताम्हिणी घाटात धावत्या एसटी बसवर दगड कोसळला

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या गोरेगाव-माजलगाव एसटी बसवर ताम्हिणी घाटात कोंडेथर गावाच्या हद्दीत दरडीचा मोठा दगड पडल्याची घटना सोमवारी (दि. १८) सकाळी घडली. या दगडाचे तुकडे चालकाच्या समोरील काचेवर व उजव्या बाजूकडील प्रवासी काचेवर पडून नुकसान झाले. या बसमधून चालक-वाहक आणि ३३ प्रवासी प्रवास करीत होते. सुदैवाने यापैकी कोणालाही दुखापत झाली नाही.



**सर्व जण सुखरूप**

माणगाव बस आगाराची गोरेगाव-पुणे-माजलगाव बस (एमएच २० बीएल ११६७) सोमवारी ३३ प्रवासी घेऊन सकाळी ७.१५च्या सुमारास कोंडेथर गावाच्या हद्दीतून जात असताना ताम्हिणी घाटात रस्त्याकडेला असणाऱ्या दरडीच्या दगडाचे तुकडे अचानक चालकाच्या समोरील काचेवर व उजव्या बाजूकडील प्रवासी काचेवर आदळले.

आंतरराष्ट्रीय दिघी बंदराशी जोडणाऱ्या माणगाव-ताम्हिणी-पुणे मार्गावरील ताम्हिणी घाटाच्या संरक्षक भिंती धोकादायक झाल्या आहेत तसेच या मार्गालगत उंच डोंगर असल्याने दरड कोसळण्याची भीती व्यक्त होत असून प्रवाशांचा जीव टांगणीला लागत आहे. अशातच सोमवारी दुर्घटना होता होता वाचली. या घटनेची माहिती समजताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेबाबत बसचालक राजाभाऊ शिंगटे यांनी माणगाव पोलीस ठाण्यात खबर दिली.

दरम्यान, ताम्हिणी घाटातील रस्ता अपघाताला निमंत्रण देत आहे. या मार्गावर दुर्घटना घडू नये म्हणून कमकुवत कठडे व धोकादायक वळणे यांना संरक्षण भिंत उभारणे गरजेचे आहे, अशी मागणी प्रवासी व पर्यटकांतून होत आहे.

# राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत क्रॉस व्होटिंग

## राष्ट्रवादी, काँग्रेस, सपमध्ये फूट

**मुंबई : प्रतिनिधी**

संसद आणि देशातील सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये राष्ट्रपतीपदासाठी सोमवारी (दि. १८) मतदान पार पडले. या निवडणुकीत एकीकडे एनडीएने आपली ताकद दाखवली आहे, तर दुसरीकडे विरोधी गटाला मात्र क्रॉस व्होटिंगला सामोरे जावे लागले आहे. गुजरातपासून ते यूपीपर्यंत राष्ट्रवादी, काँग्रेस आणि सपमध्ये फूट पडल्याचे पाहायला मिळाले.

गुजरात कंधलमधील राष्ट्रवादीचे आमदार एस. जडेजा यांनी पक्षाच्या भूमिकेविरोधात जात एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांच्या बाजूने मतदान केले. याशिवाय झारखंडमधील राष्ट्रवादीचे आमदार कमलेश सिंह यांनीही द्रौपदी मुर्मूंच्या बाजूने मतदान केले. मतदान केल्यानंतर ते म्हणाले की, मी माझ्या अंतरात्म्याचा आवाज ऐकून द्रौपदी मुर्मूंच्या बाजूने मतदान केल्याचे ते म्हणाले.

**नियमानुसार कोणत्याही पक्षाला राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी व्हिप जारी करता येत नाही. सर्व आमदार आणि खासदारांना त्यांच्या इच्छेनुसार कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याचा अधिकार आहे. पारंपरिकपणे नेते त्यांच्या पक्षाच्या भूमिकेच्या आधारावर मतदान करतात. अशा परिस्थितीत क्रॉस व्होटिंग हा कोणत्याही पक्षासाठी धक्का मानला जातो.**

एवढेच नाही, तर गुजरातमधील भारतीय आदिवासी पक्षाचे नेते छोटूभाई वसावा यांनीही द्रौपदी मुर्मू यांना मतदान केले आहे. गरिबांच्या प्रगतीसाठी काम करणाऱ्या नेत्याला मी मतदान केल्याचे ते म्हणाले.

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षातही फूट पडली. एकीकडे अखिलेश यादव यांचे काका आणि प्रसपा प्रमुख शिवपाल यादव यांनी द्रौपदी मुर्मू यांना मतदान केले आहे, तर सपचेच आमदार शाहजील इस्लाम यांनीही द्रौपदी मुर्मू यांच्या बाजूने मतदान केले. बरेलीतील भोजीपुरा येथील पक्षाचे आमदार शाहजील इस्लाम हे काही दिवसांपासून पक्षावर नाराज असल्याचे बोलले जात होते.

काँग्रेसचे ओडिसातील आमदार मोहम्मद मुकीम, हरियाणातही काँग्रेसचे आमदार कुलदीप बिश्नोई यांनी द्रौपदी मुर्मूंच्या बाजूने मतदान केले आहे. यापूर्वी राज्यसभा निवडणुकीतही त्यांनी काँग्रेसऐवजी भाजप समर्थित उमेदवाराला मतदान केले होते.

## गणेशोत्सवातील निर्बंधांवरून मंडळांची नवी मुंबई पालिकेत धाव

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक गणेशोत्सव २०२२ साजरा करण्याबााबत विविध निर्बंध घातल्याने विविध गणेशोत्सव मंडळांनी सोमवारी (दि. १८) नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांची भेट घेतली.

गणेशोत्सवात चार फूट आणि घरगुती गणेशोत्सवात दोन फूट अशी घालून दिली आहे. कोरोनाची परिस्थिती पाहता जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना जाचक असल्याचे निदर्शनास येत आहे. पालिकेने सूचना जाहीर करण्याआधी मूर्तीकारांनी मोठ्या मूर्ती घडवल्या आहेत. मार्गदर्शक सूचना उशिराने प्रसिद्ध झाल्यामुळे सर्व गणेशोत्सव मंडळांनी श्री गणेशांच्या मूर्ती अगोदरच बूक केल्या आहेत. दोन वर्षांनी गणेश उत्सव मोकळ्या वातावरणात निर्बंधांशिवाय साजरा करता येईल, यामुळे सर्व नागरिक गणेश उत्सव मंडळ आनदांत होते, मात्र गणेशोत्सवासाठी काढलेल्या मार्गदर्शक सूचनामुळे गणेशोत्सव मंडळे नाराज आहेत. त्यामुळे लोकभावनेचा विचार करून जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना ताबडतोब शिथिल कराव्यात, अशी मागणी मंडळांनी केली.

या वेळी माजी नगरसेवक संपत शेवाळे, विजय वाळुंज, प्रणव म्हात्रे, अंकुश वैती, एजाज खान, बाळू चंदानी, अनिकेत रहाटे, विजय गलांडे, उमेश पाटील तसेच विविध मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.



## ‘झिका’च्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पथक राज्यात दाखल

**पुणे : प्रतिनिधी**

पालघरमध्ये झिका विषाणूचा पहिला रुग्ण आढळल्यानंतर प्रतिबंधात्मक उपाय आणि खबरदारीसाठी केंद्रीय तज्ज्ञ आणि कीटकशास्त्रज्ञांचे पथक महाराष्ट्रात येऊन दाखल झाले आहे. ताप आल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष न करता तातडीने डॉक्टरांना दाखवावे आणि डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन या पथकाकडून करण्यात आले आहे.

डासांपासून उद्‌भवणाऱ्या झिका या विषाणूचा यावर्षीचा पहिला रुग्ण पालघर जिल्ह्यात आढळून आला आहे. तेथील तलासरी तालुक्यातील आश्रमशाळेत एका नऊ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून केंद्राचे एक पथक महाराष्ट्रात दाखल झाले असून या पथकामध्ये पुणे आणि दिल्ली येथील तज्ज्ञांचा समावेश आहे. राज्याचे कीटकशास्त्रज्ञ डॉ. महेंद्र जगताप यांनी याबाबत माहिती दिली.

डॉ. महेंद्र जगताप म्हणाले, पालघर जिल्ह्यातील गावात झिकाचा रुग्ण आढळल्यानंतर तीन किमीच्या क्षेत्रातील पाच गावांमध्ये सर्वेक्षण करण्यात येत आहे. या गावांमधील आठ रुग्णांच्या रक्ताचे नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे पाठवण्यात आले आहेत. डास अळ्यांच्या नमुन्यांचाही यामध्ये समावेश आहे. डॉ. जगताप म्हणाले, ताप येणे, अंगावर पुरळ येणे, डोळे येणे, अंगदुखी, थकवा, डोकेदुखी ही या आजाराची प्रमुख लक्षणे आहेत. लक्षणे सौम्य असतात आणि दोन ते सात दिवसांपर्यंत राहतात. लक्षणे असलेल्या रुग्णांनी पॅरासिटामॉलसारखे औषध, संपूर्ण विश्रांती आणि भरपूर पाणी पिणे आवश्यक असल्याचे डॉ. जगताप यांनी स्पष्ट केले. खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनी असे रुग्ण आढळल्यास त्यांचे नमुने तपासून घेण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

## पनवेल महापालिकेकडून खड्डे बुजवण्यास सुरुवात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांचा नागरिकांना त्रास होऊ नये याकरिता खड्डे बुजविण्याची कामे बांधकाम विभागाच्या वतीने युद्धपातळीवर सुरू केली आहेत. आयुक्तांच्या निर्देशानुसार मागील दोन-तीन दिवसांपासून महापालिका कार्यक्षेत्रातील खारघर, पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी अशा विविध विभागातील खड्डे बुजविण्यात आले आहेत.



आयुक्तांनी सोमवारी (दि. १८) विविध ठिकाणी सुरू असलेल्या रस्ते दुरूस्तीच्या कामाचा आढावा घेऊन योग्य त्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे बांधकाम विभागाने रस्ते दुरूस्तीच्या कामाला जलदगतीने सुरूवात केली आहे. कमी वाहतुकीच्यावेळी ही कामे करण्यात येत आहेत. पेव्हर ब्लॉक व सिमेंटच्या साहाय्याने हे खड्डे बुजविण्यात येत आहेत. खारघरमधील हीरानंदानी ते सेंट्रल पार्क येथील मुख्य रस्ता, उरण नाका, टपाल नाका, स्वामी नित्यानंद रोड, आदई सर्कल, मार्केट यार्ड, तक्का, पनवेल स्टेशन परिसर, साई नगर, मोठा खांदा येथील खड्डे बुजविण्याची कामे वेगाने सुरू आहेत. पालिका क्षेत्रातील बऱ्याच ठिकाणची खड्डे बुजविण्याची कामे पूर्ण झाली आहेत.

## राजस्थानातील तरुणाकडून तीन किलो अफू जप्त

**पुणे : प्रतिनिधी**

अफू विक्रीसाठी राजस्थानमधून आलेल्या एकाला गुन्हे शाखेने शहरातील टिळक रस्त्यावर पकडले. त्याच्याकडून तीन किलो अफू, मोबाइल संच, रोकड असा मुद्देमाल जप्त केला. राजू प्रतापराम गुर्जर (वय २२, सध्या रा. कुसाळकर चौक, जनवाडी, गोखलेनगर) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.

गुर्जर मूळचा राजस्थानातील पाली जिल्ह्यातील आहे. तो टिळक रस्त्यावर हिराबाग चौकात अफू विक्रीसाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट १ला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून पकडले. त्याच्याकडे पिशवीची तपासणी करण्यात आली. तपासणीत त्याच्या पिशवीत अफू सापडली. जप्त करण्यात आलेल्या अफूची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत लाखो रुपये किंमत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

न्यायालयाने त्याला २५ जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्याने अफू कोणाला विक्रीसाठी आणली होती, या दृष्टीने तपास सुरू आहे. पोलीस उपायुक्त श्रीनिवास घाडगे, सहायक आयुक्त गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप भोसले, उपनिरीक्षक संजय गायकवाड, सुनील कुलकर्णी, अजय जाधव, महेश बामगुडे, अजय थोरात, राहुल मखरे, अमोल पवार, इम्रान शेख आदींनी ही कारवाई केली.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेम या जाहिर नोटिसीदारे कळविण्यात येते कि खालील परिशिष्ट मध्ये वर्णन केलेला भुखंड प्रस्तावित १. श्री. गुरुनाथ पांडू म्हात्रे, २. श्रीमती विठाबाई पांडू म्हात्रे, ३. श्री. गणेश उर्फ रमेश माया म्हात्रे, ४. श्रीमती रामुबाई नामदेव म्हात्रे, ५. श्रीमती रंजना माया म्हात्रे, ६. श्रीमती काळूबाई माया म्हात्रे सर्व रा. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकी हक्काची. ताबेकब्जातील मिळकत असून आमचे पक्षकार मे. पी. वाय. पी. इंटरप्रायजेस तर्फे भागीदारी १. श्री. तेजस मनजी पटेल, २. श्री राजेंद्र धर्मा पाटील, ३. श्री. आनंद नारायण सुर्यवली यादव यांनी सदर भुखंड विकसनासाठी घेतलेले आहे. तरी सदर भुखंड विकसन करारनामा वरील भुखंड मालकांनी सही केलेले असून विकसन करारनाम्यात ठरविल्या अटी शर्ती प्रमाणे मोबदला स्विकारला आहे. परिशिष्ट नमुद सदर भूखंडाचा व्यवहार इतर त्रयस्त इसमांसोबत करण्यात येवू नये किंवा कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये या कारणासाठी जाहिर नोटिस प्रसिद्ध करीत आहोत. सदर भुखंडाचे वर्णन खालिल प्रमाणे :

**परिशिष्ट**
**भुखंड वर्णन**

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|---|
| रोडपाली | ४० | २० | ७९९.९५ |

प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्ट नमूद भुखंडमध्ये वा कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे व्यवहार करारमदार, सदर भूखंडाचा व्यवहार इतर त्रयस्त इसमांसोबत करण्यात येवू नये किंवा संबंधित कार्यालयातून कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये. सबब अन्य तिऱ्हाईत इसमाने व्यवहार केल्यास झालेल्या नुकसानीस सर्व संबंधित जबाबदार राहतील असे आमचे अशिलांमार्फत सुचविण्यात येत आहे. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १८/०७/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड . कांचन एस. पाटील**
**बी. ए. एलएल. बी.**

**पत्ता :** ऑफिस नं २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी. पी. पारसिक बँकेवरती लाईफ लाईन हॉस्पीटल जवळ पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल, जि. रायगड. ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११

## पमपातर्फे २८ ठिकाणी प्रिकॉशनरी डोस उपलब्ध



**महापालिका क्षेत्रात २८ लसीकरण केंद्रावर हे प्रिकॉशनरी डोस उपलब्ध करून देण्यात आले आहेत, तसेच ग्रामीण भागाकरिता फिरती लसीकरण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. कोरोनापासून संरक्षण मिळविण्यासाठी कोरोना लसीकरणाचे कवच आवश्यक आहे. सर्व लाभार्थ्यांनी प्रिकॉशनरी डोस घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.**

**पनवेल : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्ताने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १५ जुलैपासून पुढील ७५ दिवस सर्व लाभार्थ्यांना विनामूल्य कोरोना प्रिकॉशनरी डोस देण्याचे निश्चित केले आहे. पनवेल महापालिकाक्षेत्रात या प्रिकॉशनरी डोससाठी कोव्हिशिल्ड डोसचे पाच लाख एक हजार ५१० व कोव्हॅक्सिनचे ९६ हजार ३३३ लाभार्थी आहेत. या दृष्टीने प्रशासनाने नियोजन केले आहे. महापालिका क्षेत्रात पुरेशा प्रमाणात कोव्हिशिल्ड लस मात्रा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

१५ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत सर्व शासकीय लसीकरण केंद्रावरती प्रिकॉशनरी डोस मोफत देण्यात येणार आहेत. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या सूचनेनुसार १८ वर्षांवरील नागरिकांना हा प्रिकॉशनरी डोस देण्यात येणार असून अनुषंगाने दुसरी मात्रा घेऊन झाल्यानंतर सहा महिने तसेच कोरोना आजाराची लागण झाली असल्यास त्यानंतर तीन महिन्यांच्या कालावधीनंतर व्यक्ती प्रिकॉशनरी डोस घेण्यास पात्र आहे. हे प्रिकॉशनरी लसीकरण केवळ ७५ दिवस असणार आहे. गृहसंकुले, ऑफिसेस तसेच कंपन्यानी प्रिकॉशनरी डोससाठी महापालिकेतील संबधित वैद्यकिय अधिकाऱ्यांशी संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## एसटी बस बंद पडल्याने सायन-पनवेल महामार्गावर कोंडी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सायन-पनवेल महामार्गावर खड्डे बुजविण्याचे काम मागील तीन दिवसांपासून नवी मुंबई मनपाकडून सुरू असल्याने वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यातच सोमवारी (दि. १८) सकाळी पावणेबारा वाजता सीबीडीवरून पनवेलकडे जाणारी परिवहन महामंडळाची एसटी रोडपली ब्रिजवर बंद पडल्याने महामार्गावर सुमारे तीन तास वाहतूक कोंडी झाली.

महामार्गावर वाढते अपघात आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नवी मुंबई मनपाच्या अभियंता विभागाने नवी मुंबई आयुक्त अभिजित बांगर यांच्या आदेशाने आणि मुख्य शहर अभियंता संजय देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली मागील तीन दिवसांपासून खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले आहे. महामार्गावर तुर्भे ब्रिज, एलपी ब्रीज, उरण फाटा ब्रिज, ठाणे-बेलापूर रोड, ऐरोली, घणसोली, वाशी डेपो परिसर, नेरूळ, सीबीडी या ठिकाणी कनिष्ठ अभियंता आणि कामगार मिळून सुमारे २५० जणांच्या पथकाने खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण केले. दरम्यान, सोमवारी सकाळी सीबीडी येथून पनवेलला जाणारी परिवहन महामंडळाची एसटी बस खारघर टोलसमोर असणाऱ्या रोडपाली ब्रिजवर अचानकपणे बंद पडली. त्यामुळे पनवेल दिशेने मार्गावर सुमारे तीन तास वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. अखेर नवी मुंबई पोलीस वाहतूक शाखेने एसटी बस स्थलांतरित केल्याने वाहनांची कोंडी काही प्रमाणात सुटून वाहतूक सुरू झाली.

## पोलिसांनी केली रस्त्यांची डागडुजी

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा एमआयडीसी येथून अंबरनाथ, डोंबिवलीकडे जाणाऱ्या रोडवरील आयजीपीएल चौक ते नागझरी गावदरम्यानचे खड्डे अखेर पोलिसांनी स्वतः रस्त्यावर उतरून बुजवले आहेत.

तळोजा एमआयडीसी येथून अंबरनाथ, डोंबिवलीकडे जाणाऱ्या रोडवरील आयजीपीएल चौक ते नागझरी गावादरम्यानच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे होते. ते खड्डे भरण्याबाबत वारंवार एमआयडीसी प्रशासनाकडे पाठपुरावा केला, परंतु रस्त्याबाबत स्थानिक शेतकरी व एमआयडीसी यांच्यात वाद असल्याने या रस्त्याचे काम खोळंबले होते. गेले आठ ते १० दिवसांपासून सतत सुरू असलेल्या पावसाने पाणी साचल्यामुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी होत आहे. दररोज सात ते आठ वाहतूक पोलीस कर्मचारी २०० मीटरच्या अंतरावर उभा राहून रोड दुभाजकाचे काम करून वाहनचालकांना पुढे जाण्यास मार्गदर्शन करीत असतात. अंमलदार सतत पाण्यात उभे राहून कर्तव्य करीत असल्यामुळे अनेक पोलीस कर्मचाऱ्यांना पायाला त्वचेचे विकार निर्माण झाले आहेत. अखेर सोमवारी वाहतूक शाखेच्या स्तरावर साधनसामग्री उपलब्ध करून पोलीस अंमलदारांनी तीन ठिकाणचे खड्डे बुजवले. यामुळे वाहनचालकांनी या वाहतूक पोलिसांचे आभार मानले.



## वर्तकनगर नामकरण सोहळा उत्साहात

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील मौजे आवरे येथील नव्याने विकसित होत असलेल्या गट १७४,१७७,१७८,१८३,१८४ क्षेत्रात मूळ गावठण गावातील वर्तक कुटुंबीयांची वडिलोपार्जित जमिनी आहेत. येथे पूर्वापार असणारी वर्तक कुटुंबियांची शेती, निवासस्थाने यांना एक ओळख मिळावी यासाठी रविवारी (दि. १७) वर्तक कुटुंबिय एकत्र येत या क्षेत्राचा ‘वर्तकनगर’ असे नामकरण केले.




या वेळी संतोष वर्तक, मच्छिंद्र वर्तक, यशवंत वर्तक, डि.के. वर्तक, सखाराम वर्तक, विक्रम वर्तक, संतोष द.वर्तक, प्रितम वर्तक, रोशन म्हात्रे, संकेत वर्तक, परेश वर्तक, अतिश वर्तक, उमेश वर्तक, पंकज वर्तक, गणेश वर्तक, गजानन वर्तक यांच्यासह विजया वर्तक, कल्पना वर्तक या ज्येष्ठ महिलादेखील उपस्थित होत्या.


### दुखवटा

**किशोर गायकवाड**



**कर्जत** : कर्जत तालुका आरपीआय आठवले गटाचे अध्यक्ष आणि तालुक्यातील किरवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किशोर गायकवाड यांचे आजारपणामुळे निधन झाले. तालुक्यातील किरवली गावातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ पुढे संपूर्ण तालुक्यात नेण्यात किशोर गायकवाड यांचा मोठा वाटा राहिला आहे. आरपीआयमध्ये केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख होती.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. १९ जुलै २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

## निवडक

### मुलीसोबत अश्लील चाळे; गुन्हा दाखल

**पनवेल :** एका ११ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत अश्लील चाळे करणाऱ्या एका ५० वर्षीय व्यक्तीविरुद्ध खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर सेक्टर १०मध्ये पाण्याच्या टाकीजवळील झोपडपट्टीत राहणारी ११ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही घरी एकटी घरात असताना शेजारी राहणारी ५० वर्षीय व्यक्ती नूर अनारुल हुसेनने तिला जबरदस्तीने स्वतःच्या घरी आणले व तिच्या तोंडाला रुमालाने बांधून अश्लील चाळे केले. या बाबतची तक्रार खारघर पोलिसांत देण्यात आली. घटनेची दखल घेत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले.

### संगीत अकॅडमीमध्ये गुरूपौर्णिमा



**पनवेल :** रायगड जिल्ह्यातील गायक गणेश भगत यांच्या गंध सुरांचा संगीत अकॅडमीमधील विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा साजरी केली. गुरुपौर्णिमेनिमित्त संगीत अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी गंध सुरांचा संगीत अकादमीचे गुरुवर्य व प्रसिद्ध गायक गणेश भगत, शिक्षिका वर्षा लोकरे, शिक्षक प्रवीण भोपी, अभिषेक नांदगावकर, चंद्रशेखर भोपी, हनूमान पाटील, राजू भोईर यांना शाल, गुलाब पुष्प व भेट वस्तू दिल्या. या वेळी उद्योजक भास्कर अंबो फुलवरे, आरटीओचे अधिकारी दीपक उगले तसेच पालक मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी होते.

### कर्नाळा ग्रामपंचायत हद्दीत वृक्षारोपण

**पनवेल :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रजापिता ईश्वरीय ब्रह्माकुमारीजचे अनुयायी किशोर पाटील यांनी आपल्या सत्तावनव्या वाढदिवसानिमित्त रविवारी (दि. १८) आदिवासी बांधवांसह पनवेल तालुक्यातील कर्नाळा ग्रामपंचायत हद्दीतील मोकळी वन जमिन व कोरलवाडी आदिवासी वाडीच्या रस्त्यालगत अंबा, जांभूळ, चिंच, पिंपळ, बदाम ह्या जातींची फळ झाडे लावून वृक्षारोपण करून साजरा केला. या वेळी ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, सुनीता पाटील, नरेंद्र पाटील, लक्ष्मण पवार, राजेश रसाळ, तेजस चव्हाण, मानसी पाटील, गुरुदास वाघे, संतोष पवार, सचिन पाटील, सतीश मोकल अनंत ठाकूर, सिद्धेश चव्हाण, सचिन वाघे, भानुदास वाघे, अब्रार मुल्ला यांच्यासह बालग्राम मधील बालके उपस्थित होते. दरम्यान, किशोर पाटील यांनी बालग्राममधील एका विद्यार्थ्याचे वार्षिक पालकत्व स्वीकारत असल्याचेही सांगितले.



# पनवेलमध्ये प्लास्टिक बंदीबाबत प्रदर्शन

## वस्तूंच्या वापराविषयी मार्गदर्शन

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रात नुकतीच एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिक बंदीची कठोर अंमलबजावणी करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. माजी महापौर डॉ. कविता चौतमोल व आयुक्त गणेश देशमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रतिबंधित प्लास्टिकची साठवणूक, विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महानगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करण्यात येणार आहे. सामान्य नागरिकांना, व्यापारीवर्गाला, विद्यार्थ्यांना या प्लॅस्टिक बंदीमध्ये कोणकोणत्या वस्तुंचा समावेश होता व कोणकोणत्या वस्तुंना परवानगी आहे. याविषयी मार्गदर्शन होण्याकरिता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ३१ जुलैपर्यंत मार्गदर्शनपर प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयानेअधिसूचना जारी केली आहे, तसेच सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नियम ४(२) अन्वयानुसार १ जुलै २०२२ पासून एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकचे उत्पादन,आयात, साठवण,वितरण विक्री आणि वापरांवर बंदी असणार आहे.

नागरिकांमध्ये प्लास्टिक बंदीविषयी जागृती निर्माण करण्याकरिता महापालिकेच्यावतीने विविध एनजीओची मदत घेतली जात आहे. तसेच नुकतेच आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात व्यापारीवर्गाची एकदिवसीय कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते. उपायुक्त सचिन पवार आणि महाराष्ट्र महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे रायगड जिल्ह्याचे प्रादेशिक अधिकारी व्हि. व्हि. किल्लेदार, क्षेत्रीय अधिकारी, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी मार्गदर्शन केले. व्यापारीवर्गांच्या विविध शंकाचे निरसन या वेळी करण्यात आले होते.

प्लास्टिक बंदीची अमंलबजावणी करण्याकरिता महापालिकेच्यावतीने चारही प्रभागामध्ये विविध पथके तयार करण्यात आली आहेत. ही पथके त्या त्या ठिकाणी असणाऱ्या सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या नेतृत्वाखाली काम करत आहेत. या कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर ५ हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये ,तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रुपये दंड आणि तीन महिन्याचा कारावास असणार आहे.



### प्लास्टिकबंदी असणाऱ्या वस्तू

**अ) प्लास्टिकच्या कांडयासह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लॉस्टिकच्या कांड्या, प्लास्टिकचे झेंडे, कॅंडी कांड्या, आईस्क्रीम कांड्या. हॅंडल असलेल्या किंवा नसलेल्या प्लॅस्टिक पिशव्या, ब) सजावटीसाठी प्लास्टिक व पॉलिस्टीरीन (थर्माकोल) क) प्लास्टीक कंटेनर (डबे), प्लेट्स, बाऊल, ग्लासेस, कटलरी, जसे काटे, चमचे, चाकू, पिण्यासाठी स्ट्रॉ, ट्रे, ढवळण्या, (स्टिरर्स), मिठाईचे बॉक्स, आमंत्रण कार्ड, सिगारेटची पाकिटे यांची प्लास्टिक आवरणे, प्लास्टिकच्या पीव्हीसी बॅनर (१०० मायक्रॉनपेक्षा कमी).**

**या प्रदर्शनामध्ये प्लास्टिकबंदी असणाऱ्या विविध वस्तूंची माहिती देणारे बॅनर ठेवण्यात आले असून, प्लास्टिकबंदी असणारे विविध वस्तुही ठेवण्यात आले आहेत. नागरिकांनी या प्रर्दशनाला भेट देऊन माहिती घ्यावी.**

**–गणेश देशमुख, आयुक्त**



**पनवेल : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, महेंद्र गोजे, प्रसिद्धी प्रमुख हरेश साठे, दीपक दुर्गे, अशोक आंबेकर, चंद्रकांत नाईक, नवनाथ पाटील, संतोष जुमारे आदी उपस्थित होते.**

## गव्हाण विद्यालयातील शिक्षकांना पालक संघाकडून लेखणी भेट

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेजमधील सर्व शिक्षक व सेवकवृंदास विद्यालयाच्या शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेवराव ठाकूर यांच्याकडून लेखणी भेट म्हणून देण्यात आली.

नुकताच झालेल्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने नामदेवराव ठाकूर यांनी गुरुंप्रती आपला कृतज्ञ भाव व्यक्त करण्यासाठी सर्व शिक्षक व सेवकांना माननीय मुख्याध्यापिका साधना डोईफोडे व पर्यवेक्षक दीपक भर्णुके यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सत्कार केला. विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. १८) झालेल्या छोटेखानी समारंभास विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे व सेवक उपस्थित होते.

नामदेवशेठ ठाकूर यांनी कोरोनाच्या कठीण काळात त्यांच्या गावातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क स्वतः भरून अडचणीच्या काळात मदत केल्याची आठवण या वेळी पर्यवेक्षक दीपक भर्णुके यांनी नमूद केली. उपशिक्षक सागर रंधवे यांनी आभार मानले.



## उरण येथे मोबाइल शॉपचे उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील बाजारपेठ येथे मोबाइल चॉइस या दुकानाचे उद्घाटन घारापुरीचे माजी सरपंच तथा उद्योजक राजेंद्र पडते यांच्या हस्ते करण्यात आले. मोबाइल चॉइसचे मनन पटेल यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत करून आभार मानले. उरणचे आमदार महेश बालदी यांनी मनन पटेल यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



या वेळी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी भाजप उरण तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, उद्योजक राजेंद्र पडते, नगरसेवक राजेश ठाकूर, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, माजी नगरसेवक नवीन राजपाल, भरत चौधरी, लालू पटेल, मनोहर सहतीया, हितेश शाह, हस्तीमल मेहता, कुणाल शिसोदिया, अजित भिंडे, सुरज ठवले, अभिषेख जैन, हिमांशू पटेल, पुरोशोत्तम सेवक आदी उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यमात नुकताच गुरूपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी राज्यस्तरीय पुरस्कार विजेते तथा आदर्श शिक्षक सदाशिव ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात स्वर म्हात्रे आणि गायकवृंदाने सादर केलेल्या गीताने झाली. आयोजित कथाकथन आणि वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्या विद्यार्थ्यांचे या वेळी सादरीकरण झाले. सीकेटीची नृत्यांगना श्रावणी थळे हिने गणेशस्तवन आणि शारदा कौतुकम हे अप्रतिम जोडनृत्य सादर केले.

सांस्कृतिक विभाग प्रमुख सुप्रिया ताम्हनकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुणे सदाशिव ठाकूर यांनी अभ्यासात नियमितता आवश्यक आहे. खेळत असाल तेव्हा फक्त खेळाचाच विचार करा आणि अभ्यास करत असाल तेव्हा फक्त अभ्यासच करा. एकाग्रतेला फार महत्व आहे. पाठ्यपुस्तक वाचनावर भर द्या, अगदी गणिताचे पाठयपुस्तक सुद्धा ओळन्ओळ वाचणे आवश्यक आहे, असे सांगितले.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी स्नेहा शिंदे आणि समृध्दी जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या वेळी शिक्षक पालक संघाच्या व्हाईस प्रेसिडेंट तेजश्री कुलकर्णी आणि जॉईट सेक्रेटरी मोहिती जाधव, प्राथमिक मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पुर्वप्राथमिक पर्यवेक्षिका संध्या अय्यर, जुनियर कॉलेज पर्यवेक्षिका अनुराधा कोल्हे, सेकंडरी सेक्शनच्या पर्यवेक्षिका निरजा अदुरी आदी उपस्थित होते.



## 'मी उरणकर'तर्फे विविध कार्यक्रम

### आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

आमदार महेश बालदी साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवारी (दि. १७) मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान उरण तर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यता आले.

यामध्ये सकाळी झाडे लावण्यात आली. चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्या स्पर्धेत एकूण ९७ विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. दुपारी चारफाटा, उरण येथे झोपडपट्टी येथील गरजू मुलांना अन्नदान करण्यात आले. सायंकाळी ओएनजीसीनजीकच्या झोपडपट्टीमधील गरजू विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण साहित्य वाटप करण्यात आले.

या वेळी चित्रकला कार्यक्रमाचे उद्घाटन नगरसेवक रवी भोईर यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच कार्यक्रमाला भाजप चित्रपट युनियन कलाकार समन्वय विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव गौरी देशपांडे, भाजप उरण सांस्कृतिक सेलच्या सदस्य गौरी मंत्री, पर्सनॅलिटी डेव्हलोपमेंट स्कूलच्या श्लोक पाटील, पत्रकार तृप्ती भोईर आदी उपस्थित होते.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष विशाल विजय पाटेकर यांनी सर्वांचे आभार मानत असेच सामाजिक कार्य आमदार महेश बालदी यांच्यामार्फत करत राहू असे आश्वासन दिले. मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे सभासद विकास पाटेकर, शौनक समेळ, भावेश रावल, भद्रेश रावल, बादल म्हात्रे, गिरीश पाटेकर, पुनम पाटेकर, सायली पाटेकर यांनी अमूल्य मेहनत घेऊन कार्यक्रम पार पाडले.







**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या टेंभोडे येथील शाळेत विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक महादेव मधे, भाजप महिला मोर्चाच्या तालुका सरचिटणीस प्रतिभा भोईर, सुभाष भोईर, माजी सरपंच अशोक गडगे, माजी उपसरपंच ललिता भोईर, हरिश्चंद्र चौधरी, गणपत कडव, महेंद्र गडगे, मनाली भोईर, मुख्याध्यापक सुनील म्हात्रे आदी उपस्थित होते.**



## पळस्पे येथे विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व भारतीय जनता पक्ष पळस्पे यांच्या संयुक्त विद्यमाने जीवन शिक्षा विद्या मंदिर पळस्पे येथे आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू व गरीब विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रघुनाथ गवंडी, विद्यमान उपसरपंच सपना वारके, पळस्पे विभागीय अध्यक्ष सुनील गवंडी, माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य विजय गवंडी, ग्रामपंचायत सदस्य ॲड. विकास भगत, राकेश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते सज्ञन वारके, शाळेच्या मुख्याध्यापिका सुजाता भगत, शिक्षकवर्ग उपस्थित होते.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २८

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती कंपनी आर्टीफिशीयल इंटलिजियन्स क्षेत्रात काम करणारी नाही?**

*अ.* टाटा एलक्सी | *आ.* हॅपीइस्ट माइंड
*इ.* झेन्सर टेक्नोलॉजीस | *ई.* बीएएसएफ इंडिया

**२. पुढील पैकी कोणत्या कंपनीचा सेन्सेक्स ३० कंपन्यांत समावेश होत नाही?**

*अ.* सनफार्मा | *आ.* बजाज फायनान्स
*इ.* एनटीपीसी | *ई.* बजाज ऑटो

**३. भारताला आपल्या गरजेच्या इतके टक्के इंधनाची आयात करावी लागते?**

*अ.* १०० टक्के | *आ.* ८५ टक्के
*इ.* ६० टक्के | *ई.* ५० टक्के

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# बुडत्याचा पाय खोलात

एकंदर राजकारणाच्या पटलावर नजर टाकली की शिवसेनेचे अध:पतन ठळकपणे दिसून येते. अर्थात, येथे शिवसेना या शब्दाचा अर्थ उद्धव ठाकरे समर्थकांचा गट असा घ्यायचा. पक्ष प्रमुखपदी ठाकरे यांचे नाव अजुनही कायम असले तरी पक्षनेतृत्वाचा अक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेच निर्देश करताना दिसतो. शिवसेना नेमकी कुणाची या प्रश्नाचे उत्तर बुधवारी सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीच्या वेळी मिळेल असे ठाकरे समर्थकांकडून सांगितले जात असले तरी महाराष्ट्राच्या जनतेला मात्र याचे उत्तर कधीच मिळाले आहे.

**गेल्या महिन्यात गुवाहाटी येथून घडलेल्या सत्तांतराच्या नाट्याच्या वेळी तीन डझन आमदार आणि डझनभर अपक्ष यांचे पाठबळ शिंदे यांच्या मागे उभे राहिले होते. आता गावोगावच्या कार्यकर्त्यांचे लोंढे 'शिंदेसेने'त सामील होताना दिसत आहेत. ठिकठिकाणच्या नगरपरिषदा आणि नगरपालिका तूर्त बरखास्त असल्याने नगरसेवकांची मोजदाद करणे तांत्रिकदृष्ट्या योग्य ठरणार नाही. परंतु शेकडो माजी नगरसेवक शिंदेसमर्थकांच्या छावणीत एव्हाना सामील झाले आहेत. पक्षातील ही प्रचंड फूट कशी रोखावी याचा उपाय अजुनही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना सापडलेला नाही. समेटाच्या दृष्टीने काही हालचाली करण्याऐवजी ठाकरे समर्थकांचे कोंडाळे आपले नकारात्मक राजकारण सुरूच ठेवण्याच्या मन:स्थितीत आहे. पक्षनेतृत्वाच्या या मानसिकतेमुळेच एका मजबूत पक्षाचे विघटन होताना दिसते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे समर्थकांच्या गटाला सोमवारी आणखी एक निर्णायक हादरा दिला. लोकसभेत शिवसेनेचे नवे गटनेते म्हणून राहुल शेवाळे यांची नियुक्ती केली जाणार असून प्रतोदपदी भावना गवळी कायम राहणार आहेत असे सूत्रांकडून सांगितले जात आहे. शिंदे यांनी स्वत:ची मुख्य नेतेपदी नेमणूक जाहीर केली. पक्षप्रमुख पदाला मात्र त्यांनी कुठलाही धक्का न लावता पक्षाची सूत्रे आपल्याच हाती आहेत हे दाखवून दिले आहे. मुख्य प्रवक्ते खासदार संजय राऊत यांच्याकरिता मात्र हा वर्मावर घाला मानला जातो. शिवसेनेचे १४ ते १५ खासदार शिंदे यांच्या गोटात सामील होत असल्याच्या बातम्या गेले अनेक दिवस येत आहेत. राष्ट्रपतीपदाची निवडणूक संसदीय पक्षातील फुटीला कारणीभूत ठरेल असे बोलले जात होते. परंतु एकंदरीत परिस्थिती पाहून ठाकरे यांनी माघार घेत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना पाठिंबा जाहीर केला. भाजपप्रणित उमेदवाराला पाठिंबा देणे ठाकरे समर्थकांना भागच पडले. अन्यथा तेथेच पक्षाची झालेली वाताहत जगजाहीर झाली असती. महाविकास आघाडीत राहून भाजपप्रणित उमेदवाराला पाठिंबा देण्याच्या भूमिकेचे समर्थन केले गेले हे खरे. परंतु पाठोपाठ येणाऱ्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीला विरोधकांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवार श्रीमती मार्गारेट अल्वा यांना शिवसेनेचा पाठिंबा मिळाला आहे. अर्थात हा पाठिंबा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केला आहे. त्यांचे खासदार आदेशानुसार अल्वा यांनाच मतदान करतील अशी शक्यता दिसत नाही. मुख्यमंत्री शिंदे यांनी केलेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील बदलाच्या घटनाक्रमामधून एकमेव गोष्ट ठळक होताना दिसते, ती म्हणजे शिवसेनेचे विघटन. शिवसेना तशीच्या तशी मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठिशी उभी राहील आणि उद्धव ठाकरे यांच्यासोबत काही मोजकेच शिलेदार शिल्लक उरतील हे भविष्यातील चित्र स्पष्ट दिसू लागले आहे. एवढ्या महाप्रचंड संकटातून पक्षाचे गलबत कसे वाचवायचे हा एकमेव जीवन-मरणाचा प्रश्न शिवसेनेच्या पक्षनेतृत्वाला सोडवावा लागणार आहे.**


# धोकादायक दरडींवर उपाययोजना आवश्यक



**खबरबात**
**महेश शिंदे**

वरंध भोर आणि महाबळेश्वर या दोन्ही घाट मार्गात सातत्याने दरडी कोसळत असल्याने या दोन्ही घाटातील वाहतूक मंदावली आहे. त्यातच प्रशासनाने अवजड वाहतूक बंद केली आहे. भितीपोटी लहान वाहनचालकांनी या घाटाकडे पाठ फिरवली आहे. महाडकरांच्या यातना काही संपता संपत नाहीत तर यामुळे या मार्गावरील पावसाळी पर्यटनालादेखील फटका बसला आहे. मात्र पर्यटकांनाही प्रशासनाला तेवढीच साथ दिली पाहिजे. दरम्यान, पर्यटन व वाहतुकीवर अवलंबून असलेले घाटातील स्थानिक विक्रेते मात्र हवालदिल झाले आहेत.

म्हाप्रळ पंढरपूर या महामार्गावर महाड तालुक्यातील वरंधपासून भोरपर्यंत घाटमार्ग आहे. संपूर्ण कोकणला पुण्याला जोडणारा हा सर्वात जवळचा मार्ग आहे. महाडसह एमआयडीसीची वाहतूक याच घाटातून मोठ्या प्रमाणात होत असते. या घाटात महाड आणि पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सीमेवर वाघजाई मंदिर आणि त्यापुढे असणाऱ्या गावातील ग्रामस्थ रस्त्यावर हॉटेल, टपऱ्या, तसेच मका विक्री करून उदरनिर्वाह करतात. वरंध आणि महाबळेश्वर या दोन्ही घाटात ऐन पावसाळ्यात दाट धुके, कोसळणारे धबधबे, हिरवीगार झाडी पाहण्यासाठी पुणे, मुंबईसह रायगडमधील पर्यटक पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी गर्दी करतात. मात्र गेले काही वर्षांपासून या पावसाळ्यात वरंध घाटात सातत्याने दरडी कोसळून घाट वाहतुकीस धोकादायक बनू लागला आहे.



घाटातील अवघड स्थिती पाहता प्रशासनाने घाटातील वाहतूक बंद केली आहे. अवजड वाहतुकीस घाट बंद केला असला तरी लहान वाहनेदेखील घाटातून प्रवास करणे टाळत आहेत. यामुळे घाटात शुकशुकाट पसरला आहे. पावसाळ्यात कायम गजबजला जाणारा घाट सुनसान पडल्याने छोटे व्यावसायिक हवालदिल झाले आहेत.

महाड वरंध घाटात महाड आणि भोर सीमेवर वाघजाई मंदिर आहे. याठिकाणी स्थानिक ग्रामस्थ भजी आणि चहाचा व्यवसाय करतात. महाडपासून थेट पुणे, मुंबईमधील पर्यटक घाटात पावसाळ्यात धबधब्यावर भिजण्याचा आनंद घेण्यासाठी येतात. वरंध आणि महाबळेश्वर या दोन्ही घाटात पर्यटक मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. मात्र जुलै २०२१मधील अतिवृष्टीत घाटातील झालेली दुर्दशा अद्याप सुधारलेली नाही. घाटात होत असलेले भूस्खलन आणि तीव्र उतारातून येणाऱ्या दगडी यामुळे याठिकाणी पावसाळी आनंद घेणे जीवावर बेतू शकते. यामुळे प्रशासनानेदेखील वाहतुकीस बंदी केली आहे.

महाबळेश्वर घाटात ठिकठिकाणी स्थानिक व्यावसायिकांनी हॉटेल सुरु केले आहेत. या मार्गावर वाडा गावातील ग्रामस्थ तर गेले अनेक वर्षे विविध व्यवसाय करत आहेत. महाबळेश्वर मार्गावरदेखील लघु व्यावसायिक आणि विक्रेते पावसाच्या मोसमात पर्यटकांची वाट पाहत बसले आहेत.

शालेय विद्यार्थ्यांचेदेखील हाल होत आहेत. वरंध घाटात एक छोटी दरड आल्यानंतर प्रशासनाने अवजड वाहतूक बंद केली. यामुळे अवजड आणि लहान वाहनांचीदेखील या मार्गावरून वर्दळ थांबली. एस.टी. प्रवासदेखील बंद झाल्याने भोर महाड सीमेवरील गावांमधील शालेय विद्यार्थी शिक्षणासाठी वरंध गावात येतात. या विद्यार्थ्यांना देखील आता एखादी खासगी वाहन व्यवस्था करून शाळेत यावे लागत आहे. पाऊस असल्यास वाहने येत नाहीत अशावेळी विद्यार्थ्यांची शाळा बुडत असल्याने शैक्षणिक नुकसानदेखील होत आहे. रस्ता उत्तम असला तरी केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. यामुळे प्रशासनाने या मार्गावरील अवजड वाहनांचा प्रवास थांबवला आहे.

पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांनी पाठ फिरवल्याने या मार्गावरील विक्रेत्यांचे मोठे नुकसान झाले असल्याचे घाटातील हॉटेल व्यावसायिक बोलत आहेत. दरम्यान अतिउत्साही पर्यटकांमुळे काही निर्णय प्रशासनाला घेणे भाग पडते हेही तेवढेच खरे आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### आता रद्द होणार नाही राईड; उबर आणणार नवे फीचर

कॅब बुक केल्यानंतर चालक राईड रद्द करतो, असे अनेकदा दिसून येते. तुम्हालाही हा अनुभव एकदा तरी आलाच असेल. मात्र यापुढे तुम्हाला या समस्येला सामोरे जावे लागणार नाही. उबर इंडिया लवकरच एक नवे फीचर जारी करणार आहे, जे त्रासलेल्या प्रवाशांसाठी एक उपाय असू शकते. ज्यांचे ड्रायव्हर अनेकदा त्यांची राईड रद्द करतात. लवकरच उबर इंडिया एक अपग्रेड जारी करणार आहे, जे वापरकर्त्यांना ड्रायव्हरला ड्रॉप-ऑफ स्थान आगाऊ पाहण्याची परवानगी देऊन त्यांच्या ड्रायव्हरला राईड रद्द करण्यापासून प्रतिबंधित करू शकते. चाचणी दरम्यान, हे फीचर केवळ २० ठिकाणी सुरु करण्यात आले होते. हे फीचर किती चांगल्या पद्धतीने कार्य करू शकते हे पाहण्यासाठीचा हा एक प्रायोगिक उपाय होता. आता हे वैशिष्ट्य सध्या संपूर्ण उपखंडात लागू केले जात आहे. उबर इंडियाने ड्रायव्हर पेमेंटमध्ये १५% वाढ केली आहे. कॅब ड्रायव्हर्स अनेकदा प्रवाशाला त्यांना कुठे सोडायचे आहे असे विचारून राईड रद्द करतात. या नव्या अपडेटनुसार, कॅबबुक करताना सर्वोत्तम ड्रायव्हर निवडण्यासाठी प्रवाशांना मदत होईल. उबरने लागू केलेले नवीन फीचर ड्रायव्हर्सना ट्रिप विनंत्या स्वीकारण्यास किंवा नाकारण्यास अनुमती देईल. हे त्यांना प्रवाशाच्या स्थानाच्या जवळ असताना प्रदर्शित केले जाईल. ग्राहक, ड्रायव्हर्स आणि प्रवाशांसाठी गोष्टी सोप्या बनवण्यासोबतच एकूण अनुभव वाढवण्यासाठी उबर इंडिया करत असलेल्या बदलांपैकी हा एक आहे. उबरने एका निवेदनात म्हटले आहे की, ते ग्राहक आणि ड्रायव्हरच्या फीडबॅकचे निरीक्षण करतील आणि आवश्यकतेनुसार समायोजन करेल. भारतातील उबर प्लॅटफॉर्मवरील ड्रायव्हर्स आता राइड स्वीकारण्यापूर्वी पोहचण्याचे ठिकाण तपासू शकतात. मे २०२२मध्ये पायलट लाँच झाल्यानंतर ट्रिप रद्द होण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे प्रोत्साहित होऊन, उबरने प्रवास स्वीकृती निकष काढून टाकण्याचा आणि सर्व स्थानांवर बिनशर्त कार्यक्षमता आणण्याचा निर्णय घेतला.




उबेर इंडियाने पेआउट सायकलदेखील बदलली आहे. जेणेकरून ड्रायव्हर नियमित ऑनलाइन पेमेंट ट्रान्सफर करू शकतील. ग्राहक आता रोख पैसे भरणार की ऑनलाइन हे ड्रायव्हर्स ठरवू शकतात.

# खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर

डॉ. जयंत विष्णू नारळीकर ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ तथा लेखक आहेत. त्यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध गणिततज्ज्ञ रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते. त्यांची आई सुमती विष्णू नारळीकर या संस्कृत विदुषी होत्या. जयंत नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणसी येथे झाले. १९५७मध्ये त्यांनी विज्ञानात पदवी प्राप्त केली. या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज येथे गेले. तेथे त्यांनी बीए, एमए व पीएच.डी.च्या पदव्या मिळविल्या. शिवाय रँग्लर ही पदवी, खगोलशास्त्राचे टायसन मेडल, स्मिथ पुरस्कार व इतर अनेक बक्षिसेही त्यांनी पटकावली.



डॉ. नारळीकर यांचा विवाह १९६६मध्ये मंगला सदाशिव राजवाडे (गणितज्ज्ञ) यांच्याशी झाला. त्यांना गीता, गिरिजा व लीलावती अशा तीन कन्या आहेत. १९७२मध्ये ते भारतात परतले. त्यांनी मुंबई येथील टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या (टीआयएफआर) खगोलशास्त्र विभागाचे प्रमुखपद स्विकारले. १९८८मध्ये त्यांची पुणे येथील 'आयुका' संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ. नारळीकर यांच्या पत्नी मंगला नारळीकर 'नभात हसते तारे' या पुस्तकाच्या सहलेखिका आहेत. 'पाहिलेले देश भेटलेली माणसं' हे त्यांनी स्वतंत्रपणे लिहिलेले पुस्तक आहे. विविध मराठी नियतकालिकांतून जयंत नारळीकर यांचे विज्ञानविषयक ललित लेखन सातत्याने प्रसिद्ध होत असते. नारळीकरांची पुस्तके जगातील विविध भाषांमध्ये भाषांतरित झालेली आहेत.

डॉ. नारळीकर यांच्या महान कार्याची दखल अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली. त्यामुळे त्यांना अनेक मानसन्मान प्राप्त झाले. १९६५मध्ये त्यांना पद्मभूषण, तर २००४मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिवाय डॉ.भटनागर स्मृती पारितोषिक, एम.पी.बिर्ला सन्मान आणि फ्रेंच ॲस्ट्रॉलॉजिकल सोसायटीचा पिक्स ज्यूल्स जेन्सन यांसारखे सन्मानही त्यांना प्राप्त झाले. लंडनच्या रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे ते सहअधिकारी आहेत तर इंडियन नॅशनल सायन्स ॲकॅडमी आणि थर्ड वर्ल्ड ॲकॅडमी ऑफ सायन्सचे ते अधिछात्र आहेत. इंडियन नॅशनल सायन्स ॲकॅडमीच्या इंदिरा गांधी पारितोषिकानेही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. वैज्ञानिक विषयांत साहित्यिक लिखाण करून, विज्ञानाचा प्रसार करण्यासाठीही त्यांना १९९६मध्ये युनेस्कोने पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान केला आहे.

डॉ. जयंत नारळीकर यांनी सर फ्रेड हॉएल यांच्यासोबत कन्फॉर्मल ग्रॅव्हिटी थिअरी मांडली. चार दशकांहून अधिक कालावधीपासून त्यांचे खगोल भौतिकी क्षेत्रात संशोधन सुरू आहे. त्याचबरोबर सतत पुस्तके लिहिणे त्यांनी सुरूच ठेवले. सामान्य माणसाला खगोलशास्त्र समजावण्यासाठी त्यांनी गेली अनेक वर्षे प्रयत्न केले आहेत. त्यासाठी सर्व प्रसारमाध्यमांचा ते उपयोग करतात. त्यांच्या 'यक्षांची देणगी' या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांची विज्ञानकथा पुस्तके- 'अंतराळातील भस्मासूर', 'अंतराळातील स्फोट', 'अभयारण्य', 'चला जाऊ अवकाश सफरीला', 'टाइम मशिनची किमया', 'प्रेषित', 'यक्षांची देणगी', 'याला जीवन ऐसे नाव', 'वामन परत न आला', 'व्हायरस'. इतर विज्ञानविषयक पुस्तके- 'अंतराळ आणि विज्ञान', 'आकाशाशी जडले नाते' आदी आहेत.



**क्लिक...क्लिक...!**

**मुरूड : पावसाळ्यामुळे कोळी बांधवांनी आपल्या बोटी समुद्रकिनारी नांगरून ठेवल्या आहेत. नारळीपौर्णिमेच्या मुहुर्तावर बोटी पुन्हा समुद्रात मासेमारीसाठी जातील. त्यामुळे बोटी दुरुस्तीकडे कोळी बांधव आता वळले आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर


### पावसाळ्यातील आहाराविषयी जाणून घ्या या उपयुक्त टिप्स!

पावसाळा या ऋतूत स्वतःला तंदुरुस्त ठेवण्यासाठी कोणता आहार घ्यावा, तसेच हंगामी आजार टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी याबद्दल माहिती जाणून घेऊया. या ऋतूमध्ये लोकांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. कोणत्याही वेळी आजार येऊ शकतात. पावसाळा सुरू झाल्यावर आजारांचा धोका वाढतो. या ऋतूत निरोगी राहण्यासाठी जीवनशैलीत आवश्यक बदल करणे गरजेचे आहे. या ऋतूमध्ये आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. हे पटकन कळतही नाही. यामुळेच खाण्यापिण्याबाबत काळजी घेण्याची गरज आहे. या ऋतूत स्वतःला तंदुरुस्त ठेवण्यासाठी कोणता आहार घ्यावा, तसेच हंगामी आजार टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी, याबद्दल आज माहिती जाणून घेऊया. पावसाळ्यात आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी व्हिटॅमिन सीयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करावा. या ऋतूमध्ये शिंका येणे, खोकला, जुलाब आणि पोटात संसर्गाची प्रकरणे सर्वाधिक आढळतात. काहींना तापही येतो. हे टाळण्यासाठी पोषक तत्वांनी युक्त आहार घ्यावा. अधिकाधिक पाणी प्यावे आणि स्वतःला हायड्रेट ठेवावे. यासाठी आवळा, लिंबूपाणी, नारळपाणी आणि कोरफडीचा रस घ्यावा. या ऋतूत स्वच्छतेची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. फळे आणि भाज्या वापरण्यापूर्वी त्या कोमट पाण्यात मीठ घालून स्वच्छ करा. तीन तासांपेक्षा जास्त काळ ठेवलेले अन्न खाऊ नये. केळी, पपई, ताजा रस यांचे सेवन करावे. रस्त्यावरील खाद्यपदार्थ आणि पॅकबंद वस्तू खाणे टाळा, तसेच हात वारंवार चांगले धुवावेत. न्याहारीमध्ये तृणधान्ये, डाळ, दही, मुगाच्या डाळीचे थालीपीठ किंवा फ्रूटचाट यांचा समावेश करू शकता. नाश्त्यात तेलकट खाणे टाळावे. दुपारच्या जेवणात चपाती, मसूर, भाज्या, दही, कोशिंबीर घ्या. फायबर, प्रथिने, पोषक तत्वे, कार्बोहायड्रेट्स आणि जीवनसत्त्वे असलेल्या पदार्थांचा आहारात समावेश करावा. रात्रीच्या जेवणात नेहमी हलक्या आणि सहज पचणाऱ्या गोष्टी खाव्यात. रात्रीच्या जेवणात तुम्ही खिचडी, डाळ आदि खाऊ शकता. दरम्यान, तीन्ही ऋतूमध्ये पावसाळा हा चांगला मानला जात असला तरी या कालावधीत आजारपण केव्हा येईल हे सांगता येत नाही. या मुळे पावसाळ्यात खूपच काळजी घेणे महत्त्वाचे आहे. तसेच आजारपण आल्यास त्वरीत डॉक्टरांशी संपर्क साधून तपासणी करुन घेणे महत्त्वाचे आहे.



# रायगड जि.प.चे १३३ पूल धोकादायक

## दुरुस्तीसाठी हवेत ९८ कोटी रुपये



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येत असलेले १३३ पूल धोकादायक झाले आहेत. या पुलांच्या दुरुस्तीसाठी ९८ कोटी ५० लाख रुपयांचा प्रस्ताव सरकारकडे पाठवण्यात आला आहे.

स्ट्रक्चरल ऑडिटनुसार रायगड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व १३३ पूल धोकादायक आहेत. तर स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेण्यात आलेल्या पुलांची संख्या एकूण ३५ आहे. तर ९७ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे अद्याप बाकी आहे. ऑडिट अहवालाच्या शिफारशीनुसार अद्यापपर्यंत केवळ एकाच पुलाची दुरूस्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व पुलांच्या दुरुस्ती करण्यासाठी तब्बल ९८ कोटी ५० लाख एवढ्या निधीची आवश्यकता असणार आहे, अशी माहिती रायगड जिल्हा परीषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता के. वाय. बारदेसकर यांनी दिली.

रायगड जिल्हा परिषद आपल्या उत्पन्नातील सर्वाधिक खर्च हा बांधकाम विभागावर करत असते. परंतु त्यातून पुलांच्या दुरूस्तीवर खर्च केला जात नाही, असं या आकडेवारीवरून दिसून येते. मग हा खर्च होतो कुठे, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

> **पुलांच्या दुरूस्तीबरोबरच पुनर्निमाणाचीदेखील गरज आहे. या कामाकरिता जिल्हा परीषदेकडे पुरेसा निधी नाही. त्यासाठी शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली आहे. निधी उपलब्ध होताच दुरूस्तीची कामे तातडीने हाती घेतली जातील.**
> **-के. वाय. बारदेसकर, कार्यकारी अभियंता, राजिप बांधकाम विभाग**

# पोलादपूर शहरामध्ये टँकरने दूषित पाणीपुरवठा

## नगरपंचायतीच्या विरोधी गटनेत्याकडून आंदोलनाचा इशारा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत पोलादपूरकडून गेल्या काही दिवसांपासून शहरातील जयहनुमाननगर भागात टँकरद्वारे गढूळ तसेच अस्वच्छ पाणीपुरवठा होत असून, या पाण्याला उग्र वास येत असल्यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत. दरम्यान, नगरपंचायतीचे विरोधी गटनेते दिलीप भागवत यांनी शुध्द पाणी मिळेपर्यंत जयहनुमाननगरच्या ग्रामस्थांसोबत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

पोलादपूर नगरपंचायतीच्या जुन्या नळ पाणीपुरवठा योजनेचा जॅकवेल गेल्या वर्षी अतिवृष्टीदरम्यान वाहून गेल्यानंतर आजमितीस त्याजागी दुसरी जॅकवेल उभारण्यात आला नसल्याने शहरामध्ये नवीन विस्तारीत नळ पाणीयोजनेच्या पाइपलाइनमधून पाणीपुरवठा केला जात असतो. मात्र, महामार्गाच्या चौपदरीकरण कामादरम्यान या पाइपलाइनचे नुकसान झाले. त्यामुळे शहरातील हनुमाननगर भागात काही दिवसांपासून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. टँकरद्वारे दुषीत पाणीपुरवठा झाल्याने सुमारे १०-१५ नागरिकांना आरोग्याच्या समस्या उद्भवल्याने उपचारासाठी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आलेले नगरपंचायतीमधील विरोधी गटनेते दिलीप भागवत आणि नगरसेवक निखिल कापडेकर यांनी नगरपंचायतीमार्फत पाठविण्यात आलेल्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना ब्लिचिंग पावडरचे प्रमाण अतिरिक्त ठेवल्याने हे पाणी पिण्यालायक राहिले नसल्याचा आरोप केला असून, शुध्द पाणी मिळेपर्यंत स्थानिक नागरिकांसोबत ठिय्या देण्याचा इशारा दिलीप भागवत यांनी दिला.

# पावसाने उघडीप दिल्याने बळीराजा शेतीकामात व्यस्त



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने काहीशी उघडीप घेतली आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यात भात शेतीच्या कामांना गती आली आहे. शेतकरी लावणीच्या कामात व्यस्त झाले आहेत.

कर्जत तालुक्यात सुमारे ९८०० हेक्टर जमिनीवर भात शेती केली जाते. कर्जत तालुक्यातील शेतकरी मागील काही वर्षात प्रयोगशील शेती करू लागले असून भाताचे नवनवीन वाण आणून त्याची आपल्या शेत लागवड करण्यावर येथील शेतकरी भर देताना दिसत आहेत. यावर्षी जूनच्या पहिल्या तारखेला पाऊस येणार, असे हवामान खात्याने जाहीर केले होते. त्यानुसार शेतकऱ्यांनी तयारी सुरु केली होती. मात्र पाऊस उशिरा आल्याने बळीराजाने शेतात टाकलेले भाताचे बियाणे फुकट गेले. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले होते. आषाढी एकादशीच्या आधी भाताची लावणी पूर्ण करून पंढरपूरला जाणारे कर्जत तालुक्यातील शेतकरी या वर्षी लावणीची कामे पूर्ण झाली नाहीत, म्हणून नाराज होते.

जून महिन्याच्या अखेरीस पाऊस सुरु झाला, पण त्यानंतर पाऊस थांबण्याचे नाव घेत नव्हता. त्यामुळे अनेक दिवस पाण्यात राहिल्याने भाताच्या रोपांची वाढ थांबली होती. मात्र गेल्या तीन दिवसांपासून पावसाने उघडीप घेतली आहे. त्यामुळे खोळंबलेल्या भातलावणीची कामे आता शेतकऱ्यांनी गतीने सुरु केली आहेत. काही शेतकऱ्यांनी मजूर घेऊन तर काही भागात आपल्या कुटुंबातील सर्वांना एकत्र करीत शेतीच्या कामाची लगबग सुरु केली आहे.

> **भाताची लावणी ठराविक दिवसात पूर्ण करावी लागते, नाही तर शेतीवर रोगराई पसरते. जून अखेर आणि जुलै च्या सुरुवातीला चांगला पाऊस झाला असून भाताच्या लावणीची कामे आता वेगाने सुरु आहेत.**
> **-एकनाथ धुळे, शेतकरी, कर्जत**

# चांभारगणी शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

## सद्‌गुरू सेवा प्रतिष्ठान व धैर्य सामाजिक संस्था यांचा उपक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील चांभारगणी बुद्रुक येथील प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नुकतेच सद्‌गुरू सेवा प्रतिष्ठान-पुणे आणि धैर्य सामाजिक संस्था-ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सचित्र बालमित्र आणि बाराखडी या पुस्तकांचे वाटप करण्यात आले तसेच शाळेतील १२ आदिवासी विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले.

धैर्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष ओंकार उतेकर, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक महादेव उतेकर, आरोग्य विस्तार अधिकारी माने, कुष्ठरोग तंत्रज्ञ तालुका अधिकारी गीतांजली लकोळे, क्षयरोग माहिती तंत्रज्ञ संचिता तांबे, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर उतेकर, शिक्षक रविंद्र वाईकर, नवनाथ सोडनवर, संगीता धुमाळे या वेळी उपस्थित होते. या वेळी पुस्तक आणि दप्तरांचे वाटप करण्यात आले.

पुणे येथून पुस्तके आणि दप्तरांची देणगी दिल्याबद्दल शिक्षक आणि मान्यवरांनी सद्गुरु सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सचिन म्हसे यांचे आभार मानले.

# सार्वजनिक बांधकाम खात्याचा दिलासा

## मुरूडच्या विहूर पुलावरील खड्डे बुजविले



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

संततधार पावसामुळे तालुक्यातील विहूर येथील छोट्या पुलावर आणि जोड रस्त्यांवर खड्डे पडले होते. या खड्ड्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्या बाबतचे वृत्त प्रसिध्द होताच सार्वजनिक बांधकाम खात्यास खडबडून जाग आली. खडी व रेंजगा टाकून येथील मोठमोठे खड्डे बुजविण्यात आले आहेत.

निधी मंजूर होऊनही विहूर पुलाला संरक्षक भिंत न बांधल्यामुळे पुलावरून एकेरी वाहतूक सुरु आहे. मात्र त्या रस्त्यार व दोन्ही बाजूच्या जोड रस्त्यांवर पावसामुळे मोठं मोठे खड्डे पडले होते. त्यामुळे या पुलावरून प्रवास करणे फार जिकरीचे झाले होते. विशेषत: दुचाकी वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्याबाबतचे वृत्त प्रसिध्द होताच सार्वजनिक बांधकाम खात्याने विहूर पुल परिसरातील खड्डे बुजविण्याचे काम तातडीने हाती घेतल. पुलाच्या उजव्याबाजूकडील खड्डे खडी व रेंजगा टाकून बुजवून सार्वजनिक बांधकाम खात्याने प्रवासी व वाहनचालकांना तात्पुरता दिलासा दिला आहे.

# पांगळोलीत तीन गुरांचा संशयास्पद मृत्यू

**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील पांगळोली परिसरात तीन गुरे मृत पावल्याचे रविवारी (दि. १७) ग्रामस्थांना आढळले. त्याची माहिती मिळताच रोहा पशुसंवर्धन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर या गुरांच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होईल, असे पशुधन विकास अधिकारी डॉ. अक्षय सांगळे यांनी सांगितले.


**MAHAVITARAN**

**Invitation for bids on E-Tendering basis**

Tenders in e-tendering format are invited vide Tender No: SE/Pen/HR/T-11/T-12/2022-23. Brief scope of works for the Contract is as below:

T-11: Work of providing skilled / unskilled outsourcing workers on contract basis at Alibag, pen testing division and pen circle office under Pen circle.

T-12: Work of providing skilled outsourcing workers on contract basis at Goregaon division under Pen circle.

| Tender No. | Tender Fee | Tender Amount |
|---|---|---|
| T-11 | Rs.5000+ (GST18%) | 82 Lakh |
| T-12 | Rs.5000+ (GST18%) | 81 Lakh |

- Publication of NIT in News Paper and MSEDCL Web site : 19/07/2022
- Last Date & time (Hours) for submission of bid: 25/07/2022 up to 23:00 Hrs online.

**For details visit website**
**http://etender.mahadiscom.in/eTender/eatApp**

**Superintending Engineer**
MSEDCL, O&M circle, Pen


# प्लास्टिक कचऱ्याने गुरांचे आरोग्य धोक्यात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड पालीतील मोकाट गुरे सध्या आपले खाद्य कचरा कुंड्या व डम्पिंग ग्राउंडवर शोधत आहेत. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय स्वच्छतेचा प्रश्नदेखील ऐरणीवर आला आहे.

पालीतील जुने पोलीस स्थानक, कुंभारआळी, बाजारपेठ, मधलीआळी, बल्लाळेश्वर मंदिर, महाकाली मंदिर परिसर, मिनिडोअर स्टॅन्ड, भोईआळी, आगर आळी या ठिकाणी कचरा कुंड्यांवर सकाळपासूनच मोकाट गुरांची गर्दी असते. तेथे टाकलेला कचरा ही गुरे अस्ताव्यस्त करतात. त्यामुळे येथे घाण व दुर्गंधी पसरते. परिणामी नागरिकांचे आरोग्यदेखील धोक्यात येते. बऱ्याच वेळा टाकून दिलेले अन्न पदार्थ प्लास्टिक पिशव्यांमध्ये असते. त्यामुळे गुरांच्या पोटात कमी अधिक प्रमाणात प्लास्टिक जाते. प्लास्टिक तसेच सडके आणि कुजलेले अन्न पदार्थ खाऊन या जनावरांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. त्यांची पचनशक्ती मंदावते, अशक्तपणा येतो. कचरा कुंड्या व उकिरड्यावरील कचऱ्यात काहीवेळा घरगुती वापराच्या व इंजेक्शनच्या सुया असतात. त्या पोटात गेल्यामुळे जनावरांच्या जठराला व अन्न नलिकेला इजा पोहचते. सतत प्लास्टिक खाल्ल्यामुळे ते त्यांच्या पोटात साठते. त्यामुळे गुरे मरतात.

> **नागरिकांनी कचराकुंड्यांमध्ये कचरा न टाकता घंटागाडीतच कचरा टाकावा. शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी आपली जनावरे मोकाट सोडू नयेत. त्यांना पेंढा किंवा सुके व ओले गवत खाऊ घालावे.**
> **-डॉ. प्रशांत कोकरे, तालुका पशुधन विकास अधिकारी, सुधागड**

# पेण येथे लिफ्ट होलमधून पडून महिलेचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

रामवाडी येथील रॉयल गार्डिअर बिल्डिंगच्या लिफ्ट होलमधून पडून संगीता केळसकर या महिलेचा मृत्यू झाला. बिल्डरकडे वारंवार केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याने महिलेचा नाहक जीव गेल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

फिर्यादी स्वरुप संदीप केळसकर यांनी दिलेल्या माहितीनुसार रामवाडी येथील रॉयल गार्डीअर या इमारतीमध्ये भाडेकरु म्हणून राहणाऱ्या संगीता संदीप केळसकर (वय ४९) या बिल्डींगमधील लिफ्टने खाली येत होत्या. ही लिफ्ट पाचव्या मजल्यादरम्यान अचानक बंद पडली. त्या वेळी सुरक्षारक्षकाने चावीचा वापर करून लिफ्टचा दरवाजा उघडला व संगीता यांना पाचव्या मजल्यावर उतरवण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी तोल जाऊन संगीता लिफ्टच्या होलमधून तळमजल्यावर पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मी जमीन मालक श्री. एकनाथ बाळाराम तांडेल, रा. कासारभट, ता. पनवेल, जि.रायगड खालील जमीन मिळकत खरेदीदार - सुजा राजकुमार नाडर, रा. साकीनाका, मुंबई यांना कायम स्वरूपी विक्री करण्याचे निश्चित केले आहे.

**जमीन मिळकतीचा तपशिल**
**मौजे - कर्नाळा, ता. पनवेल, जि.रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| ५९ | १/क | ०-१७-५०<br>पो.ख ०-०२-२० | ३.३२ |
| | | **एकूण** ०-१९-७० | |

सदर वरिल मिळकतीची विक्री करित असून तरी सदर जमिनी बाबत इतर दुसरा कोणाचा कोणत्याही प्रकारचा साठेकरार, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, मृत्यूपत्रांकित दान , गहाण, बक्षीस, फरोक्त, भाडेपटटा, चार्ज, लिअन वगैरे इतर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाचे आत खालील सही करणार यांचे कडे प्रथमदर्शन कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी.

वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर जमिन ही निर्विवाद व निर्वेध आहे असे गृहित धरून मी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू यास मागावून येणारी हरकत, तक्रार वगैरे माझ्यावर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण - पनवेल
दि. ०४/०७/२०२२

**सही/-**
**श्री. एकनाथ बाळाराम तांडेल**
**जमीन मालक**
रा. कासारभट, ता. पनवेल, जि.रायगड
(मो.नं.९८६०२५०५३७)



## खुली ई-निविदा सूचना
## ग्रामपंचायत खानावळे, ता. पनवेल, जि. रायगड

यांचेकडील साहित्य पुरवठा कामांच्या अंतर्गत खालील कामांची निविदा योग्य त्या पुरवठादार ऑनलाईन निविदा मागवण्यात येत आहे. सदर निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल.

| क्र. | कामाचे नाव | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | छत्री खरेदी करणे | १००० | १०० | ३० days |

वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन खाली दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक पर्यंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | 15/07/2022 | 10.00 am | 21/07/2022 | 12.00 pm |
| निविदा फॉर्म व परिशिष्ट मिळवण्याचा कालावधी | 15/07/2022 | 10.00 am | 21/07/2022 | 12.00 pm |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी | 15/07/2022 | 10.00 am | 21/07/2022 | 12.00 pm |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | 22/07/2022 | 12.00 pm | | |

**अटी व शर्ती :**

१. निविदेतील लघुत्तम दरकरार धारकाने साहित्याचा पुरवठा करणेस नकार दिल्यास बयाना रक्कम जप्त करण्यात येईल तसेच अशावेळी निविदेतील अनु. क्र. २ च्या दराचा विचार झाल्यास दराच्या तफावतीची रक्कम लघुत्तम अनु. क्र. १ च्या निविदाधारकाचे त्याच्या सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल. संबंधित लघुत्तम निविदा धारकाचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल व त्यास ३ वर्षापर्यंत ग्रामपंचायत खानावळे यांचेकडून काम दिले जाणार नाही.
२. उपलब्ध तरतुदीचे आधीन राहून साहित्याचा पुरवठा आदेश देण्यात येतील निविदा सुचनेतील नमूद परिमाण संख्येत वाढ/घट होण्याची शक्यता आहे त्याबाबतचे आदेश तरतूद उपलब्ध झाल्यानंतर देण्यात येतील.
३. पुरवठा दराने पुरवठा आदेश दिल्यापासून २१-२२ पर्यंत पुरवठा करणे आवश्यक आहे मुदतीत पुरवठा न केल्यास नियमावलीनुसार पुरवठा न केलेल्या मालाच्या किमतीच्या प्रती दिन ०.५% प्रमाणे व १ लाखापेक्षा जास्त असल्यास कमाल मर्यादा ५% असेल.
४. निविदेतील तपशिलानुसार आयएसआय दर्जाचा मालाचा पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.
५. ज्या पुरवठादाराची निविदा मंजूर होईल त्यांना या कार्यालयाचे वाटप तक्त्यानुसार व निविदा मधील नमूद साहित्याच्या तपशीलाप्रमाणे सर्व माल एकत्रित करून गठीत समितीच्या तपासणीअंती संपूर्ण पुरवठा आदेश सोबत दिलेल्या यादीप्रमाणे ग्रामपंचायत खानावळे साहित्याचा माल पोहोच करावा लागेल.
६. पुरवठा करणेत येणाला साहित्यावर आर्थिक वर्ष या व (ग्रामपंचायत नाव) प्रिंट करणे आवश्यक आहे.
७. ग्रामपंचायत देईल त्या यादी प्रमाणे प्रत्येक ठिकाणी पोहोच करणे व पूर्व प्रस्थापित स्थितीत करून देणे बंधनकारक आहे व यात कोणतीही सबब चालणार नाही.
८. निविदा धारकाने निविदा भरून देणेसाठी दोन पाकीट पध्दतीचा अवलंब करावयाचा आहे.
९. साहित्य पुरवठ्याबाबत असमाधानकारक परिस्थिती आढळून आल्यास किंवा कोणताही वाद निर्माण झाल्यास आपला करार रद्द करणेच तसेच सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार ग्रामपंचायत खानावळे यांना राहील.
१०. राज्य शासन / केंद्र शासन किंवा जिल्हा परिषदेशी संबधित इसमास निविदा भरता येणार नाही.
११. कोणतीही सशर्त निविदा स्वीकारली जाणार नाही.
१२.साहित्याची तपासणी करताना साहित्यामध्ये दोष आढळल्यास ७ दिवसात निविदामधील तपशीलाप्रमाणे पुरवठा करणे बंधनकारक राहील, त्या विहित मुदतीत पुरवठा केल्या जाणाऱ्या साहित्याप्रकरणी प्रती दिन रु. ५००/- प्रमाणे दंडात्मक रक्कम वसूल करण्यात येईल.
१३. निविदेतील मंजूर दर हे २०२२-२३ पर्यंत विधीग्राह्य राहतील. तथापि सुधारित तरतुदींमुळे निविदा अंदाजित रकमेत वाढ झाल्यास निविदेतील लघुत्तम दराने पुरवठा करावा लागेल.
१४. सदर साहित्य पुरवठ्या संदर्भात न्यायालयीन बाद उद्भवल्यास न्यायालयीन ठिकाण हे खानावळे राहील .
१५. मंजूर झालेल्या निविदा धारकाने स्विकृती पत्रानुसार. मुदतीत शासकीय नियमानुसार आवश्यक रकमेच्या मुद्रांक कागदपत्रावर करारनामा केल्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात येईल.
१६. कोणतीही निविदा मंजूर करणेचा अगर कोणतेही कारण न देता नाकारणेचा, निविदेतील अटी व शर्ती शिथिल करण्याचा ग्रामपंचायत खानावळे यांचेकडे राहील.
१७. निविदेतील नमूद केलेल्या साहित्याचा दर मूल्यवर्धित कर तसेच इतर सर्व अनुवांशिक कर व शुल्कासह असावेत. सदरचे मूल्यवर्धित कर व इतर शासन खाती भरण्याची जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.
१८. निविदा प्रक्रियेबाबत कोणतीही शंका/प्रश्न असल्यास त्या बाबत निविदा भरण्याच्या अंतिम तारखेपूर्वी किमान तीन दिवस अगोदर लेखी स्वरुपात विचारल्यास शंका निरसन करण्यात येईल.
१९. निविदांची निविदा फी (Tender Fee) व इसारा रक्कम (EMD) हे बैंकच्या RTGS/NEFT ऑनलाईन पद्धतीने भरावे
२०.महाराष्ट्र शासन कडील व्यवसाय व विक्रेता नोंदणी प्रमाणपत्राची मुळ प्रत , GST, पॅन कार्ड/ स्कॅन प्रत अपलोड करावी.
२१. तांत्रिक बाबी बघितल्यावरच निविदा उघडण्यात येईल.

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत खानावळे**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत खानावळे**
**ता.पनवेल, जि.रायगड**

# सीवूड्समध्ये घरांची पडझड | दुरुस्तीची कामे सुरू करण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीवूड्स येथील सिडकोनिर्मित इमारतीच्या घरांची पडझड सुरूच आहे. ६ जुलै २०२२ रोजी सिवूडस मधील अन्नपूर्णा सोसायटी मधील हॉलचा स्लॅब कोसळण्याची घटना ताजी असतानाच रविवारी रात्री सेक्टर ४८ मधील साई संगम सोसायटीतील स्लॅबचे प्लास्टर कोसळल्याने सिडकोच्या निकृष्ट इमारतीच्या पुनर्निर्मितीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, सिडकोने दुर्घटनाग्रस्त घरांच्या दुरुस्तीचे बंद पडलेली कामे पुन्हा सुरू करावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून होत आहे.



सिडकोच्या सीवूड्स सेक्टर -४८ मधील साई संगम सोसायटी मधील इमारत क्रमांक डी-४५ मधील रूम नं ५ येथील माणिक डावरे यांच्या घरातील स्लॅबचे प्लास्टर रविवारी रात्रौ १० वाजता कोसळले. सुदैवाने या दुर्घटनेत जीवितहानी झाली नाही. सिडकोच्या इमारतीतील घरांची पडझड होण्याची जुलै महिन्यातील ही तिसरी घटना आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवीत हानी झाली नसली तरी पावसाळ्यात इमारतीचा स्लॅब कोसळल्याने सीवूड्समधील नागरिक भयभीत झाले आहेत. ही इमारती २४ वर्ष जुन्या असून यांच्या पुनर्निर्मिची मागणी वारंवार केली जात आहे.

निकृष्ठ बांधकामामुळे घराचा स्लॅब कोसळने, भिंतींना तडे जाणे, प्लास्टर कोसळणे इत्यादी घटना मागील १० वर्षांपासून वारंवार घडत आहेत. तत्कालीन भाजपचे स्थानिक नगरसेवक भरत जाधव यांनी सिडकोच्या विरोधात आवाज उठवल्याने दुर्घटना झालेल्या सदनिकेची दुरुस्ती सिडकोच्या अभियंता विभागाकडून केले जात होते मात्र सदनिकांच्या दुरुस्तीचे काम वर्षभरापासुन बंद आहे.

सिडकोच्या घरांची दुर्घटना झाल्यास सिडकोचे अधिकारी घटनास्थळी येऊन अहवाल तयार करतात, मात्र पुढे कारवाई काहीच होत नाही पडझड झालेल्या सदनिकांच्या दुरुस्तीची कामे सिडकोने वर्षभरापासून बंद केली आहेत, ती पुन्हा सुरू करावीत, अशी मागणी भरत जाधव यांनी केली आहे.

दरम्यान, नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे २०२१-२२ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर पालिका क्षेत्रात एकूण ४७५ इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. याशिवाय ज्या इमारतींचा वापर सुरू होऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा इमारतींची नवी मुंबई पालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून किंवा संरचना अभियंत्याकडून स्ट्रक्चरल ऑडिट करून घेणे अनिवार्य असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. नेमलेल्या संरचना अभियंत्याने शिफारस केलेली दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्याचे व ते बांधकाम सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र नवी मुंबई महापालिकेकडे सादर करावे लागणार आहे.

# नवी मुंबईतही 'हर घर तिरंगा'चे नियोजन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्धापन दिनानिमित केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत 'हर घर तिरंगा' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. याबाबत महापालिका स्तरावरून 'हर घर तिरंगा' उपक्रमाचे नियोजन करण्यासाठी नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांच्या नियंत्रणाखाली अंमलबजावणी समितीची नेमणूक करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त घरांवर तसेच महापालिका क्षेत्रातील कार्यालये व आस्थापना यावर स्वयंस्फुर्तीने तिरंगा फडकविणे या उपक्रमांतर्गत अपेक्षित आहे. याबाबत जनजागृती करण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिलेले असून यामध्ये नागरिकांचा उत्फुर्त सहभाग अपेक्षित आहे. या अनुषंगाने ध्वजांची उपलब्धता करुन घेण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव साजरा करीत असताना जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती चिरंतन तेवत रहाव्यात तसेच देशभक्तीची जाज्वल्य भावना मनात कायम रहावी या भावनेने आपल्या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक स्मरण करण्याच्या उद्देशाने 'हर घर तिरंगा' उपक्रम राबविला जात आहे.

या उपक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येक नागरिकाने आपला तिरंगा ध्वज स्वत: खरेदी करुन तो स्वयंस्फुर्तीने आपल्या घरावर, कार्यालयामध्ये फडकविणे अपेक्षित आहे. याशिवाय ज्या नागरिकांना राष्ट्रध्वज खरेदी करणे शक्य नाही अशा नागरिकांकरिता विविध संस्था, व्यक्ती, उदयोगसमुह यांच्या माध्यमातून राष्ट्रध्वज उपलब्ध करुन घेणे प्रस्तावित आहे. यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने संस्था, व्यक्ती. उद्योगसमुह यांना आवाहन करण्यात येत आहे.

'हर घर तिरंगा' या उपक्रमाच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढ्याविषयीच्या, क्रांतीकारकांविषयीच्या आपल्या आदराच्या भावना तसेच देशाविषयीच्या अभिमानाचे दर्शन घडविण्यासाठी प्रत्येक घरात, सोसायटीत, विभागात विविध उपक्रमांचे आयोजन केले जाऊ शकते. तसेच व्यक्तिगत आणि संस्थात्मक पातळीवरूनही विविध कार्यक्रम राबविले जाऊ शकतात. याकरिता नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने पुढाकार घेऊन 'हर घर तिरंगा उपक्रम' यशस्वी करणे अभिप्रेत आहे.

आपल्या देशाबद्दल प्रत्येकाच्या मनात असलेला आदर व सन्मान अभिव्यक्त करण्यासाठी 'हर घर तिरंगा' हा अतिशय अभिनव उपक्रम ही एक चांगली संधी असून यामध्ये प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने सक्रीय सहभागी होऊन आपल्या मनात असलेली देशभक्ती मूर्त स्वरुपात प्रकट करण्याच्या दृष्टीने आपल्या घरावर व कार्यालयामध्ये ९ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत तिरंगा फडकवावा असे आवाहन महापालिका आयुक्त बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# गावठी बनावटीचे पिस्तूल विकणारा जेरबंद



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बेकायदा रिव्हॉल्व्हर बाळगल्याप्रकरणी कोपरखैरणे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीकडून आणखी दोन देशी बनावटीची पिस्तूल हस्तगत केली आहेत. मध्य प्रदेशमध्ये पिस्तूल खरेदी करून त्यांची नवी मुंबईत विक्री करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यानुसार आरोपीची कसून चौकशी करण्यात येत असल्याची माहिती परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी दिली.

कोपरखैरणेतील माथाडी हॉस्पिटलजवळ एक व्यक्ती देशी बनावटीचे पिस्तूल घेऊन येणार असल्याची माहिती कोपरखैरणे पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सापळा रचून ऋषिकेश रणजित जायभाये ऊर्फ बाबू ऊर्फ बाब्या (वय २५) याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याची झडती घेतली असता, त्याच्याजवळ एक देशी बनावटीचे रिव्हॉल्व्हर आढळून आले होते. त्यामुळे ते जप्त करून त्याला अटक करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीकडे अधिक चौकशी केली असता त्याच्याजवळ आणखी दोन पिस्तुले असल्याची कबुली त्याने दिली होती. त्यानुसार त्याने सांगितलेल्या ठिकाणावरून पोलिसांनी आणखी दोन पिस्तुले, तसेच मोटरसायकल जप्त केली. अशा प्रकारे कोपरखैरणे पोलिसांनी आरोपीकडून तीन पिस्तुले जप्त केली.

ऋषिकेश हा मध्य प्रदेशातून २० ते २५ हजार रुपयांमध्ये पिस्तूल खरेदी करत होता. मागणीप्रमाणे त्यांची या ठिकाणी विक्री करत असल्याचे तपासात आढळून आले. तो आरोपी सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर कोपरखैरणे पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल आहेत. मध्य प्रदेशातून तो पिस्तूल कसे आणायचा? तसेच त्याची तो कशा पद्धतीने विक्री करायचा, याचा तपास करण्यात येत असल्याची माहिती पोलिस उपायुक्त विवेक पानसरे यांनी दिली.

# पामबीच मार्गावर चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

चारचाकीने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १७) सकाळी पामबीच मार्गावरील टी. एस. चाणक्य चौकात घडली. मनोजकुमार राजकुमार वर्मा (वय २२) असे मृताचे नाव आहे. तो साईवाडी येथील रहिवासी असून दूधपुरवठा करण्याचे काम करत असे. चारचाकी चालक व त्याचा साथीदार दोघांनीही मादक पदार्थाचे सेवन केल्याचे आढळून आले. एनआरआय पोलिसांनी चारचाकी चालकावर गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

मनोजकुमार वर्मा रविवारी पहाटे एनआरआय वसाहतीत दूध वितरण करण्यासाठी गेला होता. आपल्या मोपेड दुचाकीवरून तो टी. एस. चाणक्य चौकातून करावे गावाकडे वळण घेण्यासाठी पामबीच मार्गावर मधोमध उभा होता. याच वेळी वाशीहून बेलापूरच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव हुंडाई वेरणा कारने मनोजच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामुळे तो रस्त्याच्या बाजूच्या झुडपात फेकला गेला.

नागरिकांनी तसेच वाहतूक पोलिस गढरी व गवळे यांनी जखमी मनोज वर्मा याला झुडपातून बाहेर काढून तेरणा हॉस्पिटलमध्ये पाठवले, मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. चारचाकीचालक अक्षय सुर्वे व त्याचा मित्र दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दरम्यान, गेल्या आठवड्यातच पामबीच मार्गावर एका चारचाकीचा अपघात झाला होता. पामबीच मार्गावर अशा प्रकारचे अपघात नेहमीच होत असतात. या मार्गावर वाहनाच्या वेगाची मर्यादा ताशी ६० किमी असताना अनेक वाहनचालक आपली वाहने १०० किमीच्या वर नेत असतात. त्यामुळे अपघात होत असल्याचे बोलले जाते.

# आवरेतील सुयश क्लासेसतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**उरण : वार्ताहर**

सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांचा वाढदिवस राजिप शाळा पाले येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणजे वह्या, पेन कंपासमधील साहित्य तसेच चित्रकलेचे रंगीत खडू वाटप यासोबतच शालेय परिसरात वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. आवरेतील सुयश क्लासेसच्या वतीने उपक्रम राबविण्यात आले.



या वेळी सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, आवरे ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंच समाधान म्हात्रे, शालेय व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष मेनन म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, महिला सदस्य दर्शना म्हात्रे, योजना म्हात्रे, मिताली म्हात्रे, तसेच अमित म्हात्रे, तंटा मुक्ती अध्यक्ष प्रशांत म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर, राणिता म्हात्रे, सुयश क्लासेस आवरेचे अध्यक्ष निवास गावंड, शेखर म्हात्रे, सारडे विकास मंचचे कार्याध्यक्ष रोहित पाटील, सह सचिव मंगेश पाटील, शंकर पाटील, हरिष म्हात्रे, अरुण कडू, सानिका गावंड, मधवी गावंड, रामनाथ पाटील, स्नेहीत पाटील, श्रीवेद म्हात्रे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन मिलिंद म्हात्रे यांनी केले व उपस्थितांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर यांनी मानले.

# किडनीदानच्या बहाण्याने लाखोंची फसवणूक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

किडनीदान करण्यासाठी रजिस्ट्रेशन करण्याच्या बहाण्याने जुईनगरमध्ये राहणाऱ्या महिलेकडून सायबर चोरट्यांनी तब्बल १० लाख ४९ हजार रुपये उकळले. याप्रकरणी नेरूळ पोलिसांनी सायबर गुन्हेगारांच्या टोळीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

फसवणूक झालेली ४० वर्षीय महिला जुईनगरमध्ये राहते. गत फेब्रुवारी महिन्यात सायबर गुन्हेगारांच्या टोळीने महिलेच्या व्हॉट्सपवर किडनीदानासंदर्भातील मेसेज पाठवला होता. महिलेने मेसेजमध्ये असलेली लिंक उघडली असता, समोरील व्यक्तीने आपले नाव डॉ. देशमान कुमार असल्याचे सांगून किडनी डोनर कार्ड रजिस्ट्रेशनसाठी ९,९९९ रुपये भरण्यास सांगितली व बँक खात्याची माहिती दिली. त्या व्यक्तीवर विश्वास ठेवून महिलेने आधी ९,९९९ रुपये त्यानंतर १५,००० रुपये पाठविले.

महिलेला ट्रान्सफर प्लिकेशन फॉर्म पाठवून पुन्हा ३९,६५० रुपये पाठवण्यास सांगितले. याशिवाय ॲन्टी ड्रग्ज चार्जेस, रिफ्लेक्शन कोड, टॅक्स पेमेंट, प्रोसेसिंग चार्जेस, मेन्टेनन्स चार्जेस अशी वेगवेगळी कारणे सांगून त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यात लाखो रोख रक्कम पाठविण्यास भाग पाडले.

# रसायनीत वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्यसेवा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आषाढी एकादशी निमित्त प्रायमा असोसिएशनच्या डॉक्टरांनी वारकऱ्यांसाठी मोफत तपासणी करून मार्गदर्शन केले. दरम्यान, डॉक्टरांच्या या उपक्रमाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

रसायनीतील डॉक्टरांनी एकत्रित येऊन प्रायमा असोसिएशनची स्थापना केली आहे. या डॉक्टर असोसिएशनकडून ठिकठिकाणी नागरिकांच्या सेवेसाठी मोफत आरोग्यविषयक शिबिर, विविध आजारांवर मार्गदर्शन, मोफत औषधोपचार आदी कार्य केले जाते. मागील वर्षी महाड पुरग्रस्त भागातील नागरिकांना मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्याचे महत्वाचे काम या रसायनीतील प्रायमा असोसिएशनने केले आहे. यावर्षी प्रायमाचे अध्यक्ष डॉक्टर संजय कुरंगळे, माजी अध्यक्ष डॉ. रोहित कदम-पाटील यांच्या प्रयत्नाने भारत सेवा संघ या संघटनेच्या माध्यमातून आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे आलेल्या वारकऱ्यांसाठी आरोग्य सेवा देण्याचे काम हे करण्यात आले.



वारकऱ्यांची सेवा हीच ईश्वरसेवा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आरोग्य सेवा ही प्रायमा डॉक्टर असोसिएशनकडून देण्यात आली. या वेळेस डॉ. संजय कुरंगळे, डॉ. धीरज जैन, डॉ. रोहित कदम-पाटील, डॉ. राहुल यादव, डॉ. प्रशांत जगताप, या वेळेस हजारो वारकऱ्यांनी डॉ. बिलास कुलकर्णी, डॉ. युवराज या सेवेचा लाभ घेतला तसेच ही म्हशेलकर हे उपस्थित होते. वारकऱ्यांना रसायनीतील प्रायमा असोसिएशनकडून डॉक्टर सेवा मोफत मिळाल्याने त्यांनी असोसिएशनच्या डॉक्टरांचे कौतुक केले.

# सानपाडा मध्यवर्ती ग्रंथालयातील आर्ट गॅलरीची निविदा प्रक्रिया सुरू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरातील वाचनसंस्कृती अधिक प्रगल्भ व्हावी यासाठी नवी मुंबई पालिका विविध उपक्रम राबवीत असून सानपाडा येथे अद्ययावत आणि आधुनिक असे प्रशस्त ग्रंथालय उभे करणार आहे. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सध्या सुरू असून तीस कोटी खर्चाच्या या प्रकल्पात केवळ ग्रंथालय न उभारता इमारतीतील प्रवासात आर्ट गॅलरीची रचनादेखील केली जाणार आहे.

नवी मुंबई पालिका लवकरच एक डबल डेकर बस घेणार असून मुंबईच्या धर्तीवर नवी मुंबई दर्शनाचे पर्यटन सुरू करणार आहे. या पर्यटनात दर्शनासारखी काही पर्यटनस्थळ निर्माण करण्याचा पालिकेचा प्रयत्न असून यातील आर्ट गॅलरी व साठ हजारांपेक्षा जास्त पुस्तकांचे सुसज्ज असे ग्रंथालयाचा समावेश राहणार आहे.

देशातील पाच सुसज्ज ग्रंथालयांचा अभ्यास करून सानपाडा येथील ग्रंथालयाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सानपाडा सेक्टर ११ येथे ११७० चौरस मीटरचा भूखंड सिडकोकडून विकत घेऊन पालिका हे ग्रंथालय उभारत आहे. चार मजली अधिक एक मजली ग्रीन छताचा समावेश असलेल्या या ग्रंथालय उभारणीचा खर्च तीस कोटींपेक्षा जास्त होणार आहे. या ग्रंथालयात तळमजल्यावर प्रदर्शन केंद्र राहणार असून यात पुस्तकांची विक्रीसह आर्ट ॲण्ड क्रॉप्ट विक्री कक्ष राहणार आहेत. पहिल्या मजल्यावर कॉमिक, नाटक, कौटुंबिक, ऐतिहासिक, कथा, कविता, ऑडिओ व्हिडीओ, कार्टुन अशा विविध साहित्य प्रकारांतील पुस्तकांची दालने राहणार आहेत. याच भागात मोठ्यांसाठी आत्मचरित्र, राजकीय, ऐतिहासिक, योगा, धार्मिक, नातेसंबध, कौटुंबिक अशा पुस्तकांची रचना करण्यात आली आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थी व तरुणांसाठी दुसरा मजला असून यात अर्थशास्त्र, राजकारण, सामाजिक, अभियंता, विधि, मानसशास्त्र अशा पुस्तकांचा समावेश असणार आहे. याच मजल्यावर ऑडिओ व्हिडीओ व अभ्यासिका राहणार आहे. तिसरा मजला लहान मुलांसाठी राखीव असून यात शालेय अभ्यासाची पूरक पुस्तके असणार आहेत. या सुसज्ज ग्रंथालयात फिरताना अनेक पेंटिंग्ज दिसणार असून या ग्रंथालयाच्या मार्गिकेत आर्ट गॅलरी साकारली जाणार आहे. त्यामुळे ग्रंथालयाकडे आकर्षणाचे एक कारण राहणार असून नवी मुंबईतील पहिली आर्ट गॅलरी नवी मुंबईकरांना मिळणार आहे.

**झोपडपट्टीतही ग्रंथालयांचे नियोजन**

पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी वाचन संस्कृतीला महत्त्व दिले असून सर्व भाषांमधील पुस्तकांचा या ग्रंथालयात समावेश राहील याकडे लक्ष दिले आहे. ऐरोली येथील डॉ. बाबासाहेब आंबडेकर स्मृती भवनातील ग्रंथालय सध्या अनेक वाचकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. झोपडपट्टी भागही या वाचनाच्या आवडीपासून वंचित राहू नये यासाठी झोपडपट्टीत ग्रंथालये सुरू केली जाणार आहेत.

# नितीन खानविलकर उपाध्यक्षपदी नियुक्त


**नवी मुंबई : बातमीदार**

नितीन खानविलकर यांची मनसे वाहतूक उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



खानविलकर यांनी पक्ष स्थापनेपासून आजपर्यंत पक्षाची ध्येय, धोरणे तळागाळापर्यंत पोहचविली आहेत. विविध आंदोलनात सहभाग घेतला आहे.

खानविलकर हे नवी मुंबई मनसेत सक्रिय असून; त्यांनी वाहतूक व्यवस्थेबाबत सातत्याने आवाज उठवला आहे. अवजड मालाच्या अवैध वाहतुकीबाबत त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची अध्यक्ष संजय नाईक व नवी मुंबई शहराध्यक्ष गजानन काळे यांच्याकडून निवड करण्यात आली.



# पाली अंबा नदीपुलाची दैनावस्था

## रेलिंग तुटल्या, खड्डे व चिखल ■ अपघाताचा वाढला धोका



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

सततच्या मुसळधार पावसामुळे मागील आठवड्यात वाकण-पाली राज्य महामार्गावरील पाली येथील अंबा नदीवरील जुन्या पुलावरून ४ ते ५ वेळा पाणी गेले. त्यामुळे या पुलाचे लोखंडी संरक्षक कठडे तुटले आहेत. शिवाय पुलावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पुलाच्या एका बाजूला चिखल व राडारोडा पसरला आहे. त्यामुळे येथून प्रवास करणे धोकादायक झाले आहे. तसेच वाहन चालक आणि पादचाऱ्यांची खूप गैरसोय होत आहे.

वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गावरील पाली येथील अंबा नदी पूल मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो. तसेच दक्षिण कोकणातून पुणे आणि मुंबईला मुंबई-पुणे द्रुतगतीमार्गाने जाणारे प्रवाशी, वाहने व मालवाहू वाहने याच मार्गावरून जातात. येथून मोठ्या प्रमाणात प्रवासी व अवजड वाहनांची वाहतूक होते. मात्र पाली येथील जुन्या पुलावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसाळ्या आधीच या पुलाच्या मध्यावरील काही लोखंडी संरक्षक कठडे (रेलिंग) तुटले होते. आता पुलावरून पाणी गेल्यामुळे इतरही रेलिंगही वाहून गेले आहे. त्यांना आधार देणारे सिमेंटचे काही ठोकळेदेखील निसटले आहेत. कमकुवत लोखंडी कठडे, मोठमोठे खड्डे, क्षमतेपेक्षा अधिक वाहनांची ये-जा, पुलावर वारंवार वाहून येऊन साठलेला राडारोडा यामुळे वाहतुकीच्या दृष्टीने हा पाली पूल अत्यंत धोकादायक झाला आहे. पुलावरील खड्ड्यात अनेक वाहने आदळत आहेत. पादचाऱ्यांनादेखील पुलावरून जीवावर उदार होऊन वाट काढावी लागते.

**नवीन पूल अपूर्ण**

अंबा नदीवरील पाली येथील जुना पूल अरुंद व कमी उंचीचा आहे. या पुलाच्या बाजूला नव्याने मोठा पूल बांधण्यात येत आहे. मात्र दिरंगाई व संथ गतीने सुरू असलेल्या कामामुळे नवीन पुलाचे काम अपूर्ण आहे. नवीन पुलाचे काम वेळीच पूर्ण झाले असते तर प्रवासी व विद्यार्थ्यांचा खोळंबा व गैरसोय झाली नसती.

**वाकण-पाली-खोपोली राज्य महामार्गावरील कामे प्रगतीपथावर आहेत. लवकरच सर्व कामे पूर्ण करणार आहोत.**

**-सचिन निफाडे, उपअभियंता, एमएसआरडीसी**

# कर्जतमध्ये श्रवणयंत्रांचे वाटप

## भाजप नेते निल सोमय्यांची उपस्थिती



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष कर्जत विधानसभा मतदारसंघ, युवक प्रतिष्ठान आणि संकल्प सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने कर्जत येथे श्रवणयंत्र वाटप शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात ६४ लोकांना श्रवणयंत्रे देण्यात आली. या शिबिराला मुंबईचे माजी नगरसेवक निल सोमय्यांनी भेट दिली.

कर्जत शहरातील विठ्ठल नगरमधील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात श्रवणयंत्र वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भाजप कोकण समन्वयक सुनील गोगटे यांनी प्रास्ताविकात शिबिराबद्दल माहिती दिली. मुंबई महापालिकेचे माजी नगरसेवक निल सोमय्या आवर्जून उपस्थित राहिले होते. त्यांनी 'ऐका स्वाभिमानाने' या मोहिमे अंतर्गत होणाऱ्या या उपक्रमबाबत माहिती दिली. कर्जतमध्ये विविध उपक्रम राबविण्यासाठी मदत करू, असा शब्द त्यांनी दिला.

या शिबिरात ६४ लोकांना युवक प्रतिष्ठानने खास परदेशातून बनवून घेतलेली श्रवणयंत्रे अत्यल्प दरात देण्यात आली. श्रवणयंत्र मिळाल्याबाबत शिबिरार्थींनी समाधान व्यक्त केले. भाजपचे वसंत भोईर, दिनेश सोळंकी, बळवंत घुमरे, मिलिंद खंडागळे, समीर सोहोनी, मारुती जगताप, नितीन कंदळगावकर, सूर्यकांत गुप्ता, सर्वेश गोगटे, विजय कुलकर्णी, सार्थक घरलुटे, अभिनय खांगटे, दर्पण घारे, कल्पना दस्ताने, स्नेहा गोगटे, नम्रता कंदळगावकार आदी या वेळी उपस्थित होते.

# रोह्यात आणखी एका तरुणीची आत्महत्या

**धाटाव : प्रतिनिधी**

वरसे येथील बबिता छोटेलाल शर्मा (वय २०) या तरुणीने रविवारी (दि. १७) सायंकाळी गळफास घेऊन आत्महत्या केली.

रोहा तालुक्यातील वरसेतील बबिता शर्मा हिने अज्ञात कारणाने घराच्या छताला ओढणी बांधून गळफास घेतल्याची घटना रविवारी रात्री घडली. त्यावेळी घरात कोणीही नव्हते. बबिताला बेशुद्धावस्थेत पाहून नातेवाईकांनी तिला रोहा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेची नोंद रोहा पोलीस ठाण्यात अकस्मित मृत्यू म्हणून करण्यात आली असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# कर्जत लायन्स क्लब डायमंडच्या अध्यक्षपदी डॉ. निवाते



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत लायन्स क्लब डायमंडच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी डॉ. शारदा निवाते, उपाध्यक्षपदी मुग्धा ठोसर, सचिवपदी संपदा ढाकवळ आणि खजिनदारपदी नेहा दीक्षित यांची निवड करण्यात आली. एकूण ३२ सदस्य यामध्ये आहेत.

दाहिवली येथे झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन क्लबचे स्थापना अधिकारी अनिल जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. मावळत्या अध्यक्षा ॲड. गायत्री पेठे यांनी प्रास्ताविकात क्लबने राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली. सचिव वृषाली वैद्य यांनी वार्षिक अहवाल सादर केला. अनिल जाधव, नवनियुक्त अध्यक्ष डॉ. निवाते यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शुभांगी कापसे आणि राजश्री केदार यांनी केले. एन. आर. परमेश्वरन, प्रवीण सरनाईक, ज्योती देशमाने, महेश राठी, संजय गोडसे, हेमंत लोणकर, सीमा पै, रमाकांत म्हात्रे, मिलिंद पाटील, प्रवीण गांगल, हेमंत ठाकूर, सूरज पेंडसे, नागेश देशमाने, मुकेश पाटील, शिल्पा मुनी, संगीता पोतदार, नेत्रा गडकरी, संगीता कुलकर्णी, लता कुलकर्णी, भारती म्हसे आदी या वेळी उपस्थित होते.

# मुरूडमध्ये हिमोडायलिसीस मशीनचे उद्घाटन



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

संजीवनी आरोग्य सेवा संस्था मुरूडसह म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यांतील रुग्णांना डायलिसिस सेवा देत असून, रुग्णांना उत्तमोत्तम सेवा पुरविण्याचा प्रयत्न करू, असे प्रतिपादन संस्थेचे विभाग प्रमुख डॉ. मकबुल कोकाटे यांनी मुरूड येथे केले.

मुरूड येथील संजीवनी आरोग्य सेवा संस्थेला आश्रयदाते डॉ. सनाउल्ला घरटकर यांनी दिलेल्या आठ लाख रुपये किमतीच्या हिमोडायलिसीस मशीनचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त राशिद फहीम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. कोकाटे बोलत होते.

संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे यांनी प्रास्ताविक केले. मुरूडचे सुपुत्र सनाउल्ला घरटकर यांनी संस्थेला रुग्णवाहिकेसह तीन डायलिसिस मशीन्स दिल्या असून, २८ रुग्ण डायलिसीस सेवेचा लाभ घेत आहेत. आगामी काळात एचआयव्ही पॉझिटिव्ह तसेच हेपिटाईस बी या रुग्णांवरदेखील उपचार होऊ शकतील, अशी माहिती सुर्वे यांनी दिली. विश्वस्त राशिद फहीम यांनीही मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात ज्येष्ठ समाजसेविका परवीन फहीम यांनी संस्थेला वॉटरकुलर, राजू जैन यांनी इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि शमीम खतीब यांनी व्हीलचेअर भेट दिली. संजीवनी संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रकांत अपराध, ज्येष्ठ समाजसेविका परवीन फहीम, वासंती उमरोटकर, नगमा खानजादे, जहूर कादिरी, नितीन अंबुर्ले, अजित गुरव, कीर्ती शहा, शशिकांत भगत, अशोक विरकुड, अमित कवळे तसेच अविनाश भौड, सुकन्या मोरे, कुणाल सुर्वे, राकेश चोगले, गीतांजली डांगे आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

# कर्जत बामणोली येथे शालेय वस्तूंचे वाटप

## शुभ्रा प्रकल्पाचा विद्यार्थ्यांसाठी स्तुत्य उपक्रम




**कर्जत : बातमीदार**

शुभ्रा प्रकल्पाच्या वतीने कर्जत तालुक्यातील बामणोली येथे विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले.

बामणोली येथील रायगड जिल्हा परिषद शाळेतील ४२ विद्यार्थ्यांना शुभ्रा प्रकल्प यांच्याकडून बॅगा, डबे, वॉटरबॉटल, हेअरबँड आदी वस्तू देण्यात आल्या. या वेळी शुभ्रा संस्थापिका भाग्यश्री वर्तक, शाळेच्या मुख्याध्यापक संजय पानपाटील, शिक्षक दिनेश बडेकर, अंगणवाडी सेविका नीता पन्हाळे, सामाजिक कार्यकर्त्या अतुलराजे जाधव, कल्पना पवार उपस्थित होते.

# चिखले आश्रमशाळेत स्वच्छता जनजागृती



**अलिबाग : प्रतिनिधी**

कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालयाच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यामध्ये कार्यरत असणाऱ्या जन शिक्षण संस्थान-रायगड या संस्थेतर्फे सोमवारी (दि. १८) चिखले (ता. पनवेल) येथील आदिवासी आश्रम शाळेत स्वच्छता जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, संचालक विजय कोकणे आणि व्यवस्थापक मंडळाच्या मार्गदर्शनातून भारत सरकारच्या कौशल्य विकास योजने अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. चिखले आश्रम शाळेतील सोमवारी घेतलेल्या कार्यक्रमात आदिवासी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली तसेच विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी पॅडचे व सर्व उपस्थितांना कापडी पिशव्यांचे वाटप करून स्वच्छतेचे महत्त्व सांगण्यात आले. या वेळी स्वच्छतेवर आधारित घोषवाक्य स्पर्धा घेऊन विजेत्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

जन शिक्षण संस्थानचे संचालक विजय कोकणे, मुख्याध्यापक विष्णू गायकर, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक श्रद्धा साळुंखे, राजेंद्र गर्जे, पूजा गायकर, अंजली भोईर, कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, कर्मचारी हिमांशू भालकर या वेळी उपस्थितीत होते.

# तिघर शाळेचा अनोखा उपक्रम

## शालेय मंत्रिमंडळ निवड करण्यासाठी प्रतिकात्मक इव्हीएम मशीनचा वापर







**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या तिघर शाळेमध्ये प्रतिकात्मक ईव्हीएम मशीनच्या सहाय्याने शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक घेण्यात आली.

शालेय विद्यार्थ्यांना या मतदान प्रक्रियेची माहिती व्हावी, या उद्देशाने तिघर (ता. कर्जत) येथील प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी ईव्हीएम मशीन प्रतिकृतीच्या सहाय्याने शाळेच्या मंत्रिमंडळाची निवडणूक घेतली. त्यात सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन मतदानाचा हक्क बजावला. शाळेचे मुख्याध्यापक भगवान इंगळे, विषय शिक्षिका सविता खडे, योगिता अहिरराव, उपक्रमशील शिक्षक जनार्दन पजई यांनी सर्व विद्यार्थ्यांना निवडणूक पक्रियेविषयी मार्गदर्शन केले. शालेय मंत्रिमंडळ निवडणूक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडली.

# कर्जतचे पाली-भूतीवली धरण ओव्हरफ्लो



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

पाटबंधारे विभागाने बांधलेले कर्जत तालुक्यातील पाली-भूतीवली धरण पूर्ण भरून वाहू लागले आहे. मात्र कालवे पूर्ण झाले नसल्याने धरणाचे पाणी शेतीसाठी सोडले जात नाही. दरम्यान, या धरणावर जाण्यास पर्यटकांना बंदी आहे.

कर्जत-नेरळ रेल्वेपट्ट्यातील सुमारे ११०० हेक्टर शेतीला सिंचनासाठी पाणी मिळावे या प्रमुख हेतूने पाटबंधारे विभागाने भिवपूरी रोड रेल्वेस्थानकासमोर पाली-भूतीवली धरण उभारले आहेम मात्र कालवे खोदण्यात आले नसल्यामुळे आजतागत धरणाचे पाणी शेतीसाठी देण्यात आलेले नाही. परिणामी ३५ दशलक्ष घनमीटर पाणी साठवण क्षमता असलेल्या या धरणात मोठ्या प्रमाणात पाणी शिल्लक राहते.

या वर्षी पावसाने उशिरा सुरुवात केली असली तरी अवघ्या दहा दिवसांत धरणातील जलाशयाने आपली पातळी गाठली. सकाळी धरण ओव्हरफ्लो झाले. तो अनुभव धरणाच्या खाली असलेल्या आसल, भूतीवली या गावातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी अनुभवला. तसेच धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर पाण्यासोबत खाली येणारे मासे पकडण्यासाठी परिसरातील ग्रामस्थ जमले होते.

दरम्यान, पाली-भूतीवली धरणावर वर्षा सहलीसाठी आलेल्या किमान १५ जणांचा जलाशयात बुडून मृत्यू झाला आहे. त्यामुळे या धरणाच्या परिसरात पर्यटनासाठी येण्यास पाटबंधारे विभाग आणि नेरळ पोलिसांनी बंदी घातली आहे.

**पाली भूतीवली धरणात बुडून यापूर्वी अनेक पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. ते लक्षात घेऊन पर्यटकांना पाली भूतीवली धरणाच्या परिसरात जाण्यास बंदी घातली आहे.**

**-राजेंद्र तेंडुलकर, पोलीस निरीक्षक, नेरळ पोलीस ठाणे**

# पेणमध्ये आनंदमंगल त्रैमासिकाचे प्रकाशन





(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

पुज्य आबा महाराज परांजपे यांनी स्थापन केलेल्या मंगलवन संस्थानने यंदा गुरुपौर्णिमेला सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्त संस्थेच्या पेण येथील साधनाश्रमात प्रवचनकार राजेंद्र पाटणकर हस्ते आनंदमंगल त्रैमासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

या प्रकाशन सोहळ्याला संस्थेचे अध्यक्ष शरद मोरे, कार्यवाह सुगम खोपकर, त्रैमासिकाचे संपादक नंदकुमार कोरगांवकर, सहसंपादक अनंत पाटील, व्यवस्थापक रमेश पाटील, समर मोरे, रघुनाथ रसाळ, प्रकाश इंदुलकर, चंद्रकात काळे, मुग्धा घाटे यांच्यासह साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुवर्णमहोत्सवी वर्षातील गुरुपौर्णिमा उत्सवदेखील मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. त्याला आमदार रविशेठ पाटील, जिपच्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष शरद मोरे व पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.

# पंतची कमाल, पांड्याची धमाल!

## इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या वनडेसह मालिकेवर भारताचा कब्जा






**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

ऋषभ पंतचे दमदार शतक आणि हार्दिक पांड्याच्या अष्टपैलू योगदानाच्या जोरावर भारताने तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात यजमान इंग्लंडवर पाच गडी आणि ४७ चेंडू राखून मात केली. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत २-१ अशी बाजी मारली.

मँचेस्टर येथे झालेल्या तिसऱ्या सामन्यात इंग्लंडने दिलेले २६० धावांचे आव्हान भारताने ४२.१ षटकांत पूर्ण केले. भारतीय संघाची चार बाद ७२ अशी स्थिती होती, पण पंत (११३ चेंडूंत १६ चौकार आणि दोन षटकारांसह नाबाद १२५ धावा) आणि पांड्या (५५ चेंडूंत १० चौकारांसह ७१ धावा) यांनी पाचव्या गड्यासाठी १३३ धावांची निर्णायक भागीदारी रचल्यामुळे भारताला विजय मिळवण्यात यश आले.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिल्यावर इंग्लंडचा डाव ४५.५ षटकांत २५९ धावांत संपुष्टात आला. मोहम्मद सिराजने जॉनी बेअरस्टो आणि जो रूट यांना खातेही न उघडता बाद केले. मग सलामीवीर जेसन रॉय (४१), बेन स्टोक्स (२७) आणि कर्णधार जोस बटलर (६०) यांनी इंग्लंडचा डाव सावरला. या तिघांनाही पांड्याने माघारी धाडले. त्यानंतर मोईन अली (३४), लियाम लिव्हिंगस्टोन (२७) आणि क्रेग ओव्हरटन (३२) यांनी काही काळ खेळपट्टीवर टिकाव धरल्याने इंग्लंडला अडीचशे धावांचा टप्पा ओलांडता आला. भारताकडून पांड्याने (४/२४) अप्रतिम गोलंदाजी केली.

यानंतर २६० धावांचा पाठलाग करताना भारताची आघाडी फळी पुन्हा अपयशी ठरली, परंतु पंत आणि पांड्या यांनी जबाबदारीने खेळ करीत विजय मिळवून दिला.

# आशियाई शरीरसौष्ठव स्पर्धेत सुभाष पुजारींनी जिंकले सुवर्णपदक

**पनवेल : वार्ताहर**



५४व्या आशियाई शरीरसौष्ठव स्पर्धेत पळस्पे महामार्ग पोलीस दलाचे सहाय्यक निरीक्षक सुभाष पुजारी यांनी सुवर्णपदक पटकाविले. त्यामुळे पोलीस दलासह पनवेलकरांनी आनंद व्यक्त केला आहे.

मालदीव येथे आशियाई शरीरसौष्ठव अजिंक्यपद स्पर्धा सुरू असून या स्पर्धेत ८० किलो वजनी गटात सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी सुवर्णपदक जिंकले. त्यांच्या या यशाने महाराष्ट्र पोलीस दलाचे व भारत देशांचे नाव उंचावले आहे. याबद्दल पुजारी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

भारताचा ८१ सदस्यीय जम्बो संघ या स्पर्धेसाठी मालदीवमध्ये दाखल झाला आहे, तर आशियातील २४ देशांमधून शेकडो खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे.

दरम्यान, महाराष्ट्राच्या नऊ सदस्यीय संघाला व्यायाममहर्षी मधुकर तळवलकर यांचे आशीर्वाद लाभले आहेत. यशस्वी व्हा, अशा शब्दांत तळवलकरांनी महाराष्ट्राच्या खेळाडूंना शुभाशीर्वाद दिले आहेत. संघटनेचे अध्यक्ष प्रशांत आपटेही सोबत आहेत. त्यामुळे आणखी काही पदकांची अपेक्षा आहे.

# भारताविरुद्धच्या मालिकेसाठी पूरनकडे विंडीज संघाची धुरा

**बार्बाडोस : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौऱ्यावर कसोटी मालिका २-२ अशी बरोबरी, तर वनडे आणि टी-२० मालिका २-१ अशी जिंकल्यानंतर भारतीय संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यावर भारत तीन वनडे सामने आणि पाच टी-२० सामने खेळणार आहे. या दौऱ्यासाठी भारताचा संघ यापूर्वीच जाहीर झाला आहे. आता विंडीजनेही आपल्या वनडे संघाची घोषणा केली आहे.

भारताविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी विंडीजचे नेतृत्व निकोलस पूरन करणार आहे, तर उपकर्णधार म्हणून शाई होपची निवड करण्यात आली आहे.

**वनडे संघ :** निकोलस पूरन (कर्णधार), शाई होप (उपकर्णधार), जेसन होल्डर, शमर ब्रुक्स, किसी कार्टी, रोव्हमन पॉवेल, अकील होसेन, अल्जारी जोसेफ, ब्रँडन किंग, काईल मेयर्स, गुडकेश मोती, किमो पॉल आणि जेडन सील्स.

# राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत नवी मुंबईतील खेळाडूंचे सुयश



**नवी मुंबई : बातमीदार**

अहमदनगर येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय सिनिअर अ‍ॅण्ड मास्टर किकबॉक्सिंग स्पर्धेत नवी मुंबईतील ३० खेळाडूंनी सहभाग घेत सहा सुवर्ण, दोन रौप्य आणि सहा कांस्यपदके जिंकली. सुमारे ३० जिल्ह्यांतील ९००पेक्षा जास्त खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

स्पर्धा महाराष्ट्र किकबॉक्सिंग असससोसिएशचे अध्यक्ष निलेश शेलार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या स्पर्धेत नवी मुंबईतील किकबॉक्सिंगपटू सुरज पुजारी, मानसी पवार, स्विटी परेरा, पायल सक्सेना, आर्यन चव्हाण व सिद्धारत कुडवा यांनी सुवर्ण, आदिल मन्या व अंकिता सिंग यांनी रौप्य, तर आदित्य अडांगळे, अथर्व जोशी, लक्ष्य शर्मा, प्रफुल्ल सरगर, साहिल कदम व सत्यम सोंकर यांनी कांस्यपदक पटकाविले.

यापैकी सुवर्णपदक मिळवलेले खेळाडू १८ ऑगस्ट रोजी चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय सिनिअर किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या खेळाडूंना सुरज पुजारी व नवी मुंबई किकबॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष आशिष यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.

# इंग्लंडच्या स्टोक्सची वनेडतून निवृत्ती



**लंडन : वृत्तसंस्था**


इंग्लंडच्या कसोटी संघाचा कर्णधार आणि अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सने आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेणार असल्याचे जाहीर केले आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मंगळवारी (दि. १९) होणारा एकदिवसीय सामना त्याच्या कारकिर्दीतील शेवटचा सामना ठरणार आहे. आपल्या अधिकृत ट्विटर अकाउंटवर एक पत्र लिहून त्याने याबाबत घोषणा केली.

बेन स्टोक्स म्हणाला, मी मंगळवारी डरहॅम येथे इंग्लंडसाठी माझा शेवटचा एकदिवसीय सामना खेळणार आहे. मी या फॉरमॅटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेणे अत्यंत कठीण आहे. मला माझ्या सहकाऱ्यांसोबत इंग्लंडसाठी खेळतानाचा प्रत्येक मिनिट आवडतो. आम्ही आतापर्यंत अविश्वसनीय प्रवास केला आहे. हा निर्णय घेणे कठीण होते, मात्र एकदिवसीय क्रिकेटमध्ये मी माझ्या संघसहकाऱ्यांना १०० टक्के योगदान देऊ शकत नाही. इंग्लंडची जर्सी घालणाऱ्या कोणत्याही खेळाडूकडून ही वाईट कामगिरीची अपेक्षा नसते. येथून पुढे माझ्याकडे जे काही आहे ते मी कसोटी आणि टी-२० क्रिकेटसाठी देईन. मी कर्णधार जोस बटलर, प्रशिक्षक मॅथ्यू मॉट, खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊ इच्छितो.

# विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत भारताच्या अंजुम मुदगिलला 'कांस्य'

## पुरुषांच्या सांघिक गटात रौप्यपदक

**चँगवॉन (कोरिया) : वृत्तसंस्था**



भारताच्या अंजुम मुदगिलने 'आयएसएसएफ' विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. अंजुमने अंतिम फेरीत ४०२.९ गुणांसह तिसरे स्थान मिळवले. दुसरीकडे, पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स सांघिक गटात संजीव राजपूत, चैन सिंह आणि ऐश्वर्य प्रतापसिंह तोमर या भारतीय त्रिकुटाने रौप्यदपक जिंकले.

महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स प्रकारातजर्मनीच्या ॲना जॅन्सेनने (४०७.७ गुण) सुवर्ण आणि इटलीच्या बार्बरा गॅमबारोने (४०३.४ गुण) रौप्यपदक आपल्या नावे केले. अंजुमचे विश्वचषक स्पर्धेतील हे दुसरे पदक आहे. गेल्या महिन्यात बाकू येथे झालेल्या विश्वचषकात तिने याच प्रकारात रौप्यपदक जिंकले होते.

पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स सांघिक गटात भारताच्या त्रिकुटासमोर सुवर्णपदकाच्या लढतीत चेक प्रजासत्ताकचे आव्हान होते. पीटर निमबुरस्की, फिलिप नेपेयचाल आणि जिरी प्रिव्रात्स्की यांचा समावेश असलेल्या चेक प्रजासत्ताकच्या संघाने चुरशीच्या लढतीत १६-१२ अशी सरशी साधत सुवर्णपदक जिंकले.

भारतीय नेमबाजांनी या विश्वचषकात आतापर्यंत चमकदार कामगिरी केली आहे. रविवारी एक रौप्य आणि एक कांस्यपदक मिळवत भारताने एकूण ११ पदकांसह आपले अग्रस्थान कायम राखले आहे. भारताच्या खात्यावर चार सुवर्ण, पाच रौप्य आणि दोन कांस्यपदके आहेत.

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी शंकर गदईकडे महाराष्ट्र संघाचे नेतृत्व



**मुंबई : प्रतिनिधी**

हरियाणातील चरखी येथे २१ ते २४ जुलै या कालावधीत होणाऱ्या ६९व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राने आपला अंतिम संघ जाहीर केला आहे. राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पहिल्यांदाच विजेतेपद मिळविणाऱ्या अहमदनगर संघाचा संघनायक शंकर गदई याच्या गळ्यात पहिल्याच वर्षी महाराष्ट्र संघाच्या नेतृत्वपदाची माळ पडली.

या संघाचे प्रशिक्षक प्रशांत चव्हाण आपल्या अनुभवाचा कसा उपयोग करून घेतात आणि नवोदित खेळाडू त्यांना कशा प्रकारे सहकार्य करतात यावर महाराष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे. हा संघ मंगळवारी (दि. १९) मुंबईतील वांद्रे टर्मिनन्स येथून गरीबरथ रेल्वेगाडीने स्पर्धेकरिता रवाना होईल.

**संघ :** शंकर गदई-संघनायक, राहुल खाटीक (दोन्ही अहमदनगर), अक्षय उगाडे, सिद्धेश पिंगळे (दोन्ही मुंबई शहर), अक्रम शेख (मुंबई उपनगर), अस्लम इनामदार, अक्षय भोईर (दोन्ही ठाणे), मयूर कदम (रायगड), आकाश शिंदे (नाशिक), शेखर तटकरे (रत्नागिरी), किरण मगर (नांदेड), देवेंद्र कदम (धुळे). प्रशिक्षक प्रशांत चव्हाण(ठाणे) व्यवस्थापक आयुब पठाण (नांदेड), फिजिओ ट्रेनर पुरुषोत्तम प्रभू.




# बुद्धिबळपटू डी गुकेशचा विक्रम

## २७०० एलो गुणांचा टप्पा पार करणारा सर्वांत युवा भारतीय



**बिल (स्वित्झर्लंड) : वृत्तसंस्था**

भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेशने ली क्वँग लिएमवर विजय नोंदवत स्वित्झर्लंड येथे सुरू असलेल्या बिल बुद्धिबळ महोत्सवातील ग्रँडमास्टर ट्रायथलॉनमध्ये अग्रस्थान मिळवले. यासह त्याने 'लाइव्ह रेटिंग'मध्ये २७०० एलो गुणांचा टप्पाही पार केला. ही कामगिरी करणारा १६ वर्षीय गुकेश सर्वांत युवा भारतीय आणि जगातील तिसरा सर्वांत युवा बुद्धिबळपटू ठरला आहे.

'लाइव्ह रेटिंग'मध्ये सामन्यातील कामगिरीच्या आधारे खेळाडूंची गुणवारी बदलत असते. त्यामुळे गुकेशने लिएमवर मात केल्यानंतर त्याला २७०० एलो गुणांचा टप्पाही पार करता आला. आपले क्रमवारीचे गुण २७००हून अधिक ठेवण्यासाठी गुकेशला पुढेही चांगली कामगिरी सुरू ठेवावी लागेल.

बिल बुद्धिबळ महोत्सवातील ग्रँडमास्टर ट्रायथलॉनमध्ये गुकेशने आतापर्यंत दर्जेदार खेळ केला आहे. त्याने १० सामन्यांत १६.५ गुणांसह अग्रस्थान मिळवले आहे. दुसऱ्या स्थानावरील लिएमचे १५ गुण, तर तिसऱ्या स्थानावरील आंद्रे एसिपेन्कोचे १४.५ गुण आहेत.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com